



श्रीमद् आद्य शंकराचार्य कृत
काशी पंचकम्
सौ शैलजा सुनील लुले




शास्त्रं शारीरक मीमांसा देवस्तु परेमश्वरः।
आचार्याः शंकराचार्याः संतु मे जन्मजन्मनी।।




## प.पू डॉक्टरकाका देशमुख

*सौ शैलजा सुनील लुले ह्यांच्या अध्यात्म ट्रस्ट शिवगड येथे झालेल्या अभ्यास वर्गातील प्रवचनावर आधारित*

❖

# श्रीमद् पूज्य भगवद्पाद आद्यशंकराचार्य कृत

# II काशीपञ्चकम् II

❖

## काशीचे पारमार्थिक वैभव

❖

**विषय प्रवेश**

**श्रद्ध्येय डॉ सुनील ना लुले**

❖

**शब्दांकन**

**डॉ वसुधा विनोद देव**

**अकोला**

प्रकाशन :- अद्विका प्रकाशन यवतमाळ

प्रकाशक :- डॉ वैशाली सुश्रुत लुले

❖

संपादक :- डॉ ओवी अद्वैत लुले

❖

प्रथमावृत्ती :- दिनांक २१ /०५ २०२२

❖

मुखपृष्ठ :- डॉ वसुधा विनोद देव

अकोला

❖

अक्षर जुळवणी :- डॉ वसुधा विनोद देव

अकोला

❖

मूल्य :- प्रसाद भेट

❖

C सौ शैलजा सुनील लुले

मो नं ८८८८८५०८६०

## ॥ अर्पण पत्रिका ॥




काशीक्षेत्रं शरीरं त्रिभुवनजननी व्यापिनी ज्ञानगंगा
भक्तिः श्रद्धा गयेयं निजगुरुचरणद्ध्यानयोगः प्रयागः।

**<u>प. पू. डॉक्टर काका देशमुख ह्यांचे चरणी अर्पण</u>**

काशीपञ्चकम्

(श्रीमच्छंकरभगवत्पादविरचितम्)

मनोनिवृत्तिः परमोपशान्तिः
सा तीर्थवर्या मणिकर्णिका च
ज्ञानप्रवाहा विमलादिगंगा
सा काशिकाऽहं निजबोधरूपा ॥१॥

यस्यामिदं कल्पितमिन्द्रजालं
चराचरं भाति मनोविलासम्
सच्चित्सुखैका परमात्मरूपा
सा काशिकाऽहं निजबोधरूपा ॥२॥

कोशेषु पञ्चस्वधिराजमाना
बुद्धिर्भवानी प्रतिदेहगेहे ।
साक्षी शिवस्सर्वगणोऽन्तरात्मा
सा काशिकाऽहं निजबोधरूपा ॥३॥

काश्यां हि काशते काशी
काशी सर्वप्रकाशिका।
सा काशी विदिता येन
तेन प्राप्ता हि काशिका ॥४॥

काशीक्षेत्रं शरीरं त्रिभुवनजननी व्यापिनी ज्ञानगंगा
भक्तिः श्रद्धा गयेयं निजगुरुचरणध्यानयोगः प्रयागः।
विश्वेशोऽयं तुरीयः सकलजनमनः साक्षिभूतोऽन्तरात्मा
देहे सर्वं मदीये यदि वसति पुनः तीर्थमन्यत्किमस्ति ॥५॥

!! इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यस्य
श्रीगोविंदभगवत्पूज्यपादशिष्यस्य
श्रीमच्छंकरभगवतः कृतौ
काशीपञ्चकम् संपूर्णम् !!

## ॥ विषय प्रवेश ॥

काशी पंचकम हे अभिनव स्तोत्र आहे काशीचे वर्णन आचार्यांनी केले आहे. आचार्यांनी तीन श्लोकात हे वर्णन मांडले आहे . काशीला बाबत मृत्यू यावा तो केवळ काशीलाच असा एक समज आहे .गंगेच्या काठावर काशी आहे आणि ह्या ठिकाणी ज्याचा मृत्यू झाला तो तरला .आणि ह्या समजामुळे माणूस जरी आयुष्यभर हा सुख लोलुप राहिला तरी मृत्यू च्या समयी तो काशी आणि गंगेची अपेक्षा करतो. .वास्तविक आयुष्य भर सुखलोलुपतेत राहिलेला व्यक्ती हा शेवटच्या क्षणी गंगेच्या अतिशय थंड पाण्याचा स्पर्श सहन करू शकणार नाही कारण त्याची अंतिम समयी देह बुद्धीच प्रबळ राहते .त्यामुळे मग मोक्ष संभावणे शक्यच नाही .पण अंतःकाळी काशीला जाण्याची पद्धत बळावते आहे हे ही वास्तव आहे. .संत कबीरांनी आपल्या मृत्यू समयी मागर नावाच्या गावी न्यावे हि इच्छा व्यक्त केली . हेच गाव निवडण्याचे कारण म्हणजे, मागर ह्या गावी मृत्यू झाला तर गाढवाचा पुढचा जन्म मिळतो अशी धारणा आहे .आणि म्हणून संत कबीरांनी ह्या गावाचीनिवड केली . संतानी देह ठेवल्यावर बाकी लोकामाधी गाढवाच्या पुनर्जन्मा बाबत धारणा गळून पडली . संत आपल्या जीवनात जे मार्गदर्शन देऊ शकतात हि बाब ह्या स्तोत्रावरून कळते . मरण समयी आपण कोठे असावे हे कळते .व्यावहारिक स्वरुपाची काशी जेथे त्रिवेणी संगम आहे, घाट आहे, तीर्थ क्षेत्र .आहे .ह्या सर्वांचे विश्लेषण आचार्यांनी केले आहे .

शास्त्र दोन सत्ता मानते १) व्यावहारिक २) पारमार्थिक ३) प्रतीभासिक सत्ता ..आपण जगतो ती व्यावहारिक व स्वप्नातील आहे ती

प्रतिभासिक जगत .हे व्यावहारिक जगतात जगत असताना अकर्ता हि भूमिका असायला हवी .व्यवहारात जी सुख दु:ख येतात त्याची जाणीव होते .पण पारमार्थिक सत्तेत सुख आणि दु:ख हे कल्पित भासमान आहे .होणारे दु:ख कल्पित आहे आणि ते आपण स्वतः करून घेतले आहे . सुख आणि दु:खाला कल्पित मानल्यास ते आपल्याला लिप्त करू शकत नाही .तरंगाचे रुपांतर लाटेत होता कामा नये .तरंगाची लाट केली कि त्याचे रुपांतर सुख किंवा दु:खात होते .सगळ्यात राहून कशात नसणे हि हातोटी आत्म्याची आहे .तीनही अवस्थात तो आहे पण तो अलिप्त आहे .तीनही सत्तेत तो व्याप्त आहे पण तो अलिप्त आहे .अलीप्ततेत असणारी व्याप्तता परमार्थाला मान्य आहे .तसेच व्यावहारिक सत्तेत आपण असावे पण त्यात आपण लिप्त नको ."आवा चालली पंढरपुरा !! अशी अवस्था व्हावयास नको .

**काशीचे पारमार्थिक वर्णन :-** चंद्र हा आल्हादकारक शीतल प्रसन्न आहे पण ज्या अधिष्ठानावर तो आहे त्याचेही तेच स्वरूप असे हा सिद्धांत आहे .त्याचप्रमाणे ज्या अधिष्ठानावर काशी वसलेली आहे तिचेही स्वरूप आनंदमय आहे . संताच्या अनुभवातील जशी काशी तशी माझी दृष्टी व्हायला हवी .आई चे रूपे वेगळी असतील पण संतानी वर्णन केलेले मातृत्व हे वैश्विक आहे .हे मातृत्व समजले कि दृश्य स्वरूपातील आई अदृश्य होत जाते आणि अदृश्य स्वरूपातील आई अधिक व्यापक होते व ती अमीट असते .आणि म्हणून संतानी जी पाहिली त्या काशीचा अनुभव घेणे हे महत्वाचे आहे .आणि म्हणून जसे मातृत्व बघावे तसेच तत्व अनुभूती महत्वाची ठरते .

ह्या स्तोत्रात प्रत्येक श्लोकाच्या शेवटी **"सा काशिकः निजबोध रूपः !!"**असे वर्णन आले आहे .ह्या शब्दाची फोड केल्यास "सः" म्हणजेच तत्वरूप ,,"काशिका" म्हणजेच काशी ,"अहं" म्हणजे"मी" ,निजबोध रूपः असे शब्द ह्यात येतात .ह्यात "सः" हे शक्तीचे प्रगटन असल्याने काशिका हा शब्द वापरला आहे .निजबोध ह्या शब्दात नि +ज +बोध +रूप असे चार शब्द आहेत .जे कधीच जन्मलेलेच नाही त्याचा बोध आणि ते बोध रूप होणे ह्या बोधाचे बाबत खालील काही मुद्दे महत्वाचे ठरतात .

१) अनुभवणे :-ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये व्यावहारिक सत्तेतील अनुभव घेतात

२) समजणे ;- सांगितलेले आणि समजलेले ह्यात बरेचदा तफावत असते . अर्थानिष्पत्ती हि स्वबुद्धी च्या माध्यमातून करण्यात येते त्यालील बारकावे समजणे महत्वाचे असते

३) कळणे :- त्यावेळा समजत नाही पण उशिरा उमजते झोपलो हे समजत नाही पण जग आल्यावर कळते .हे कळणे अभावात्मक असते

४) बोध :-बोध हा इंद्रियांच्या पलीकडे असतो बोध जागृतीत असतो. बोध निद्रेत नसतो .जागृतीत असतो पण इंद्रियांना त्याचा थांगपत्ता लागत नाही .इंद्रियांची नजर स्थूल आहे .त्याचा पहारा स्थूल असतो म्हणून इंद्रिय नेणे भोग ते असे म्हणण्यात येते .कळलेले उमजत नाही पण श्रीगुरू जेव्हा त्याची उकल करतात तेव्हा ते उमजते .अनुभव समजणे कळणे ह्यातून पारमार्थिक सत्तेत जाणे हे महत्वाचे आहे

म्हणून इंद्रियांना जे कळले नाही त्याचा बोध गुरु ने करून दिला .ह्या बोधाचे प्रबोधात रुपांतर करणे हि बाब महत्वाची ठरते ."जीवत्वाची खंत स्वरूपी विराली"असे संत म्हणतात .प्रमाणांनी किंवा इंद्रियांनी ते सिद्ध होत नाही .ढग आल्याने सूर्य दिसत नाही .ज्या अर्थी ढग दिसतात त्या अर्थी सूर्य आहे .अंधाराचे प्रकाशन उजेड करतो ,शून्याचे प्रकाशन आत्मा करतो म्हणून केवळ शून्यातच समाधान मानणे योग्य नाही .शून्याचा आनंद हा परमानंद नाही .हे ढग बाजूला सारण्याचे कार्य प्रथम जरी श्रीगुरू करीत असले तरी त्यानंतर प्रत्येक वेळेला आलेले ढग हे स्वतःला दूर सरावे लागतात .परमात्मा सजातीय नाही विजातीय नाही स्वागत नाही तर ह्या तीनही भेदाच्या च्या पलीकडे असणारे जे आहे ते मी आहे ह्याला  बोध असे म्हणतात .हा स्वरूप बोध सत्संग, श्रीगुरुंशी होणारी आत्मचर्चा ह्यातून होतो .कारण "वादे वादे जायते तत्व बोधः" हा नियम आहे .तीन भेदांचा अभ्यास  ह्यासाठी महत्वाचा आहे .हे चार भेद पुढील प्रमाणे आहेत .

**सजातीय भेद** :_(बिया विरहित चिकू ,बिया सहित चिकू )आपण सर्व जीव आहोत हा सजातीय भेद आहे

**विजातीय भेद** :-(आंबा चिकू) मी देह आहे असे म्हणणे हा विजातीय भेद आहे

**स्वगतभेद** :- (चिकूचे साल त्यातील गर त्याच्या बिया )मी ब्रह्म आहे असे वाटणे हा स्वगत भेद आहे

मी ब्रह्म आहे ह्या वाटण्याच्या पलीकडे जाणे म्हणजे निजबोध होय .ह्या तीनही भेदाच्या अतीत जाणे  म्हणजे निजबोध होय .

"मी आत्मा स्वानंद कंद ! ऐसा अखंड परमानंद !
प्रत्यक्ष पदाचा निजबोध ! गोविंदा बोलीला !!

मी आनंद रूप आत्मा आहे .आनंद कंद म्हणजेच हा आनंद कुणावरही म्हणजेच व्यक्तीवर व कशावरही म्हणजेच वस्तूवर अवलंबून नाही .माझा आनंद हा वस्तू किंवा व्यक्तीवर अवलंबून राहता कामा नये .असे असेल तरच मी आनंदरूप आहे अन्यथा मी जीव भावातच आहे असे समजायला हरकत नाही .आणि अशा वेळी मला मिळणारे सुख हे सापेक्ष सुख असते. विषय, व्यक्ती निरपेक्ष सुखाला आनंद म्हणतात .मी परमानंदाचा कंद आहे तर मला आनंदासाठी दुसऱ्या कोणत्याच घटकाची आवश्यकता नाही .पण व्यक्तीची जीवनातील दु:खाबाबत तक्रार असते आणि हया सर्व बाबी इतरावर अवलंबून ठेवतो .हयाबाबत दोष हा आपलाच असतो, कारण दुखः देणाऱ्या बाबींना आपणच स्वीकारतो .पण श्रीगुरू शिवाय माझ्या हृदयात अन्य काहीही असू नये .हा निजबोध म्हणजेच मी आणि मीच म्हणजे काशी आहे .हयासाठी देह बुद्धी ते आत्मबुद्धी करावी लागते आणि म्हणून हयाची प्राप्ती कशी करावी हयाचे विवेचन आचार्यांनी केले आहे .

!! रामकृष्ण हरि !!

श्रद्धेय डॉ सुनील काका लुले

यवतमाळ

## ॥ विषय विवेचन ॥

शंकराचार्यांनी काशी चे महत्व पाच श्लोकांच्या सहायाने वर्णन केले आहे .काशी पंचकम्  मध्ये काशी चे पारमार्थिक स्वरूप विषद केले आहे.व्यावहारिक दृष्ट्या काशीला महत्व आहे .मुक्त होण्यासाठी सर्व सामान्यांची धाव काशीकडे असते .ह्या काशीचे पारमार्थिक महत्व काय हे सांगण्यासाठी आचार्यांनी  तेथील स्थळांची रूपके अत्यंत प्रभावी पणे मांडलेली आहेत .त्यात प्रामुख्याने मनकर्णिका .गंगा नदी ,प्रयाग ह्यांचा वापर केला आहे .धार्मिक रित्या सर्वांना काशीचे महत्व माहित आहे पण पारमार्थिक महत्व समजावे व पारमार्थिक दर्जा समजावा व काशीला न जाता सुद्धा तेथे गेल्याचे समाधान साधकास मिळावे ह्या करिता आचार्यांने हे स्तोत्र रचलेले आहे . शस्त्राने  तीन प्रकारच्या सत्ता सांगितलेले आहे  जीव हा तिन्ही सत्तेत वावरतो.

१) व्यावहारिक सत्ता :- जागृतीतील जी सत्ता आहे तिला व्यावहारिक सत्ता म्हणतात .

२) प्रतीभासिक सत्ता :- स्वप्नातील सत्तेला प्रतीभासिक सत्ता म्हणतात कारण हि भासणारी  सत्ता आहे .

३) पारमार्थिक सत्ता.:- सर्व  सत्तेच्य पलीकडे पारमार्थिक सत्ता असते आणि ह्या सत्तेत श्रीगुरूंचा समावेश  असतो.ह्या पारमार्थिक सत्तेत स्वरूपा कारता अनुभवता येते .ह्या ठिकाणी श्री गुरूंचा आशिर्वाद महत्वाचा आहे .म्हणून पारमार्थिक सत्ता महत्वाची आहे .कारण व्यावहारिक सत्तेत हे सुख

आणि दुखः ह्या दोन्हीचा समावेश असतो पण पारमार्थिक सत्तेत केवळ आनंद असतो .हा आपला अनुभव आहे .स्वप्न व जागृतीत च्या जगात खूप सुखाचे आणि दु:खाचे अनुभव असतात . पण पारमार्थिक सत्तेतील आनंद हा कशावरही अवलंबून नाही आणि तो प्राप्त करून आनंद स्वरूप होणे हेच जीवनाचे ध्येय आहे .काशी चा संबंध धार्मिक दृष्टीने पाहता मोक्षाशी आहे .कारण काशी च्या मनकार्निका घाटावरील अंतक्रिया हि मोक्षास कारणीभूत ठरते असा एक धार्मिक समज आहे त्याच प्रमाणे अध्यात्मिक दृष्टीकोनातून काशीचा संबंध मुक्तीशी आहे .काशीला जाऊन गंगा स्नान व कशी विश्वेश्वराचे दर्शन हे व्यवहारात महत्वाचे मानले जाते पण एव्हढेच मोक्षासाठी पुरेसे नाही .आणि म्हणून मोक्षासाठी पारमार्थिक दृष्टी विकसित करावी लागते .व्यावहारिक सत्तेत व्यवहार हे करावेच लागतात पण पारमार्थिक सत्तेतील व्यवहार मात्र अत्यंत जागरूकतेने करावा लागतो . पारमार्थिक सत्याचा विचार केल्यास ह्याचे महत्व रूपकाच्या दृष्टीने असून तो मग अनुभूतीचा विषय बनतो पण केवळ दर्शन केल्याने मोक्ष मिळतो हि साधकाची श्रद्धा त्याला परम् पदापर्यंत नेण्यास पुरेशी नाही म्हणूनच काशीचे पारमार्थिक महत्व ह्या स्तोत्रातून आचार्यांनी मांडले आहे .व्यावहारिक सत्तेत राहूनच आम्हाला पारमार्थिक सत्याचा अनुभव घेता येऊ शकतो हे मार्गदर्शन ह्या स्तोत्रात आचार्यांनी केले आहे .व्यावहारिक सत्तेत कर्म करताना त्यात "मी अकर्ता" आहे हि भूमिका अत्यंत महत्वाची ठरते .ह्या प्रमाणे पारमार्थिक सत्ता व व्यावहारिक सत्ता ह्यांचा सुंदर मेळ जर आम्हाला घालता आला तर

आमचे निश्चित शाश्वत कल्याण होईल .ह्या प्रमाणे काशी क्षेत्राचे पारमार्थिक महत्व लक्षात घ्यावे .त्याचे तीर्थक्षेत्र म्हणून त्यातील "तीर्थत्व" लक्षात घ्यावे लागेल .तीर्थाला तीर्थत्व हे संतामुळे येत .संतामुळे काशीच्या गंगा स्नानाला महत्व प्राप्त झाले आहे हे तीर्थत्व समजून घेणे हि साधना आहे .

ह्या स्तोत्रात प्रत्येक श्लोकाच्या शेवटी "सा काशिकाः निजबोध रूपः" हे चरण आलेले आहे.काशी क्षेत्राचे परमार्थिक स्वरूप हे नीज बोधात्मक आहे म्हणजेच काशी चे स्वरूप समजण्यासाठी ज्ञान अर्थात आत्मज्ञान होणे अवश्यक आहे . "पाहावे आपणासी आपण ! त्या नाव ज्ञान !! असे संतानीही म्हटले आहे .हीच स्वरुपाकरता म्हणजे ज्ञान म्हणजेच बोध .निजबोध म्हणजेच काशी .काशी चे पारमार्थिक स्वरूप हे निजबोध आहे .आणि ह्या साठी आपल्याला पारमार्थिक दृष्टीने काशी कडे पाहण्याची दृष्टी विकसित करावे लागेल .

जीव हा सुखाच्या मागे धावतो. सर्व धडपड सुखासाठी करतो अशावेळी शुद्ध पुण्य ची जोड असेल तर हि बाब लक्षात येते कि ज्ञानेन्द्रीयाकडून व विषयापासून मिळणारे सुख हे अल्प जीवी आहे .आणि ह्या सुखाची परिणीती कधी तरी दुखःद होते हे निर्विवाद सत्य आहे .म्हणून सुख आणि दु:खाच्या पलीकडे जर जायचे आहे तर ह्याबाबत काही योजना आहे का ह्याबाबत चे विचार माणसाच्या मनात येतात .तो कायम ह्या जन्म मरणाच्या चक्रातून दूर होण्याचा प्रयत्न करीत असतो .संसार चक्रात अडकून पडण्याचे मुख्य कारण जर कोणते असेल तर ते

म्हणजे स्वानुभवाचे अज्ञान .हे अज्ञान दूर झाल्यावर स्वता:च्या स्वरूपाबाबत चे जे ज्ञान आहे त्याला नीजबोध असे म्हणतात .मीच आनंद रूप आहे, सुखरूप आहे ह्या अनुभवला जीव जेव्हा प्राप्त होतो त्याला निजबोध  असे म्हणतात .निजबोध ह्या शब्दाची शब्दशः उपपत्ती सांगावयाची झाल्यास नि =नकारात्मक प्रत्यय ज=जन्माला आलेले . बोध =ज्ञान म्हणजेच जे कधीच जन्माला आले नाही त्याबाबत चे ज्ञान म्हणजे नीजबोध होय .ज्याचा जन्मच नाही ,जे कधी उत्पन्न झाले नाही पण ते ज्ञानरूप  आहे त्याला नीजबोध असे म्हणतात .म्हणजेच स्वरूपाचे ज्ञान म्हणजेच आत्मज्ञान .म्हणजेच ज्ञानरूप होणे .तसेच "नीज" म्हणजे जवळचे .म्हणजेच ह्या दृष्टीने "तेच मी आहे" हा अनुभव  ह्यात अंतर्भूत आहे .

"मी आत्मा स्वानंद कंद ! ऐसा अखंड परमानंद !

प्रत्यक्ष पदाचा निजबोध! गोविंद बोलीला!

नाथ महाराजाच्या ह्या ओवीत प्रत्यक्ष निजबोधाचे वर्णन आपल्याला कळते .प्रत्यक्ष व्यवहाराचा विचार करता आपण जीवाच्या जवळच्या प्रत्येक गोष्टीत रमतो .जीवाच्या सर्वात जवळचा देह, इंद्रिय, तीन अवस्था, म्हणजेच जागृती, स्वप्न, सुषुप्ती, अंतःक्करण,अतिशय जवळचे आहे , विकार ,पाप पुण्य नाते संबंध ,नातेवाईक हे सर्व घटक जीवाच्या अत्यंत जवळचे आहेत .ह्यामुळे व्यक्ती सुखी आणि दु:खी होतो परतू ह्या सर्व गोष्टीना जे अधिष्ठान आहे ते आत्मतत्वाचे  चे  आहे ,चैतन्य तत्वाचे  आहे आणि "ते मी आहे" .म्हणजेच जे जवळचेआहे  सर्व

जीवलगांचे अधिष्ठान आहे ती आत्मसत्ता आहे आणि "ते मी आहे" ह्या ज्ञानाला निजबोध म्हणतात आणि ते म्हणजे काशी क्षेत्र आहे . ज्या प्रमाणे आई ला केवळ आपले मुल दिसते त्याचे पद प्रतिष्ठा ह्यातील काही बाबीचे तिला फारसे महत्व नसते त्याच प्रमाणे ज्या वेळी ह्या जीवाला आपण आत्मतत्त्व आहोत आणि ते सर्व माझ्याच सत्तेवर आहे असे जीवाला कळते ते मीच आहे हे ज्ञान जीवाला होते तेव्हा तो आत्म स्वरूपाशी ऐक्य पावतो . आणि हे ऐक्य म्हणजे निजबोध आहे .उपाधीविरहित ज्ञान म्हणजे नीज बोध आहे .असा निजबोध हा श्रीगुरुंच्या कृपेने साध्य होते .आचार्यांनी काशीचे पारमार्थिक स्वरूप सांगितले

. ह्या जगात जेव्हढे म्हणून ज्ञानाच्या संकल्पना आहेत त्या सर्वांना प्रमाण ,गृहीताकांची गरज असते म्हणजेच ते सर्व ज्ञान हे प्रमाण व गृहितकावर आधारित असते .वस्तू ज्ञान ,त्याचे नाम रूप आकाराचे ज्ञान हे सर्व ज्ञान त्रीपुटीतून प्राप्त झाले .त्यात ज्या वस्तूचे ज्ञान होते ती वस्तू ,ज्याला ज्ञान प्राप्त होते तो मी आणि ज्ञान प्राप्त होण्याची प्रक्रिया आहे .ज्ञात ज्ञान व ज्ञेय हि ती त्रिपुटी होय .दृश्य जगतातील ज्ञान हे त्रिपुटी जन्य ज्ञान होय ह्याला बोध म्हणता नाही .पण आत्मज्ञान हे त्रिपुटी विरहित असते .आणि ह्याला निजबोध म्हणतात .

"ज्ञातु ज्ञेया विहीन ! नुसतेची जे ज्ञान !
सुखा भरले गगन ! जाणिवेची !!

नीज बोधाचे ज्ञानासाठी फक्त "तेच मी आहे" हा निर्णय लागतो .म्हणून निजबोध म्हणजे आत्मज्ञान .ज्या प्रमाणे अग्नी आणि उष्णता हे

एकमेकापासून वेगळे करता येत नाहीत त्याच प्रमाणे आत्मा आणि ज्ञान वेगळे करता येत नाही .आणि म्हणून निजबोध म्हणजे अत्यंत जवळचे ज्ञान अज्ञानामुळे तो दूर वाटतो पण ज्ञान झाले कि तेच मी आहे .ह्यालाच निजबोध असे म्हणतात .हा निजबोध आहे ....

ऐसा परमात्मा परमानंद ! सजातीय विजातीय स्वगत भेद !
नसोनिया वस्तू शुद्ध ! प्रसिद्ध जाण निजबोध !!

आत्मवस्तू मध्ये तीनही भेद नाही

सजातीय भेद :- सर्व फळे

विजातीय भेद :- फळे फुले पाने

स्वागत :- एकाच आंबा पण त्याचे प्रकार

हे संपूर्ण दृश्य जगत भेदाने भरले आहे .पण आत्मवस्तू भेदरहित आहे ती अत्यंत शुद्ध आहे,त्यात कशाचीच भेसळ नाही .हे आनंदरूप आहे आणि "ते मी आहे" हे जाणणे म्हणजे निजबोध .व्यावहारिक सत्तेत व्यवहार हे करावेच लागतात .पण त्यामागे पारमार्थिक सत्तेला जाणून घेणे हा उद्देश असावा लागतो .जगतातील प्रत्येक घटकाला विभूती मानून त्यात भेद करता येणार नाही पण सर्प हा विषारी आहे करिता त्याच्याशी व्यवहार जपूनच करावे लागतील .व्यावहारिक सत्ता मोडकळीस न आणता आम्हाला पारमार्थिक सत्तेचा अनुभव घ्यावा लागतो .ह्या पारमार्थिक सत्तेत आम्हाला नीजबोधला प्राप्त व्हायचे आहे . ह्याची आठवण राहावी व आमचा निर्णय व्हावा म्हणून आचार्य वारंवार आम्हास तोच संदेश देत आहोत .


स्तोत्रातील पाच श्लोकामधून आचार्यांनी वेगवेगळी साधने सांगितले आहे आणि ह्या साधनांच्या माध्यमातून काय साध्य करायचे आहे हे आचार्यांनी सांगितले आहे .माणसाला शरीराच्या स्तरावर मृत्यू चे

सत्ता जाण्याचे इ भय असते पण ह्यातील क्षणभंगुरत्व लक्षात आले कि मग स्वरूप ज्ञानाचा मार्ग मोकळा होतो .व्यक्तीला बाह्य जगताचे ज्ञान होते कारण व्यक्ती ज्ञान स्वरूपच आहे .मी मूळचाच ज्ञानरूप आहे मी आनंदरूप आहे सुख आणि दु:ख ह्याच्या पलीकडे माझे स्वरूप आहे हे स्वरूपाचे ज्ञान आहे . मी आनंदरूप आहे त्याला निजबोध म्हणतात ."आनंदाचे डोही आनंद तरंग" हा संताचा अनुभव माझाही होतो त्यालाच निजबोध म्हणतात .अशा पद्धतीचा निजबोध म्हणजे काशी आहे .आत्मस्वरूप अनंत आहे ते सीमित नाही ,देश काळाने तो सीमित नाही मी अमर्यादित आहे हा अनुभव निजबोध आहे .मी नित्य उपलब्ध आहे नाम रूप जरी भिन्न असले तरी स्वरूपाने मी एकमेव आहे .आणि हेच निजबोध आहे.ह्या निजबोधाला मला प्राप्त व्हायचे आहे .जीवाला सातत्याने देह इंद्रिय ह्याचा अनुभव येतो .हे सर्व चेतन असल्याचा आम्हाला भास होतो त्यात आम्ही रमतो रेंगाळतो .तथापि इंद्रिय जड आणि अचेतन असतात ते प्राण शक्ती मुळे हालचाल करतात .हि प्राणशक्ती आत्मा सत्तेच्या अधिष्ठानावर कार्यरत असते .ते आत्मतत्त्व मी आहे .असे ज्ञान झाले कि इंद्रियांच्या व्यापाराकडे त्रयस्थ दृष्टीने पाहणे सुलभ होते .अशावेळी इंद्रियांचे अनुसंधान न होता आत्म्याचे अनुसंधान होईल .आणि माझ्या अधिष्ठानावर देह आणि इंद्रियांचे कार्य होते अशी अनुभूती आली कि सुख आणि दु:खाची अनुभूती येणार नाही तर सर्वत्र आनंदाचीच अनुभूती येईल . हे होणे म्हणजे निजबोध होय .सर्वात महत्वाचे म्हणजे निजबोध हा दैनंदिन जीवनात अनुभवण्याची गोष्ट आहे .फक्त अभ्यास करण्याची बाब नाही पण त्यासाठी सद्गुरूचे मार्गदर्शन महत्वाचे ठरते .सर्व विश्वाला जी स्फुरण देणारी जी सत्ता आहे ती आत्मसत्ता आहे आणि ती मी आहे .मीच सर्व घटकांचा प्रकाशक आहे

आणि बाकी सर्व जगात प्रकाश्य आहे हि अनुभूत् म्हणजे निजबोध होय तुपाच्या एका छोट्या कणी च्या आत बाहेर तुपच असते तसेच मी आत्मा सर्व देह इंद्रियांना व्यापून आहे . हा अनुभव म्हणजेच निजबोध आहे . ह्या वेळी माझे दृश्य आणि द्रष्टुत्व हा भाव आटतो .ज्याला ब्रह्म ज्ञान झाले तो कर्म करतो पण त्याला कर्म स्पर्श करू शकत नाही ..ज्याला निजबोध झाला त्याला कर्माचा लेप नसतो .कारण आत्मत्वाने तो निरुपम आहे ..ज्या क्रिया इंद्रियाकडून होतात त्या सर्व आत्मरूप असतात .म्हणून संत म्हणतात "विषय तो त्यांचा झाला नारायण ! .नावडे जन धन माता पिता" .ह्या सर्वाबाबत ते अनासक्त होतात .अत्यंत प्रेमाने व्यवहार होतात कारण ह्यामागे मी प्रेम स्वरूप आहे हे ज्ञान त्या ठिकाणी असते .म्हणूनच निजबोध प्राप्त करण्यासाठी असा अभ्यास महत्वाचा ठरतो आचार्यांच्या काशी पंचाकम् ह्या स्तोत्रातून हाच अभ्यास करायचा आहे .

!! रामकृष्ण हरि !!

सौ शैलजा सुनील लुले
यवतमाळ


Kāshi Yātra
A Spiritual journey with Jagadguru
Sri Shankara Bhagavathpada
Produced by Homa Records specially for
Shankara Matam, Varanasi under the
guidance of the Acharyas of

## || श्लोक क्रमांक ०१ ||

मनोनिवृत्तिः परमोपशान्तिः
सा तीर्थवर्या मणिकर्णिका च
ज्ञानप्रवाहा विमलादिगंगा
सा काशिकाऽहं निजबोधरूपा ॥१॥

***प पू डॉक्टरकाका उवाच*** :- पारमार्थिक दृष्ट्या काशी क्षेत्र कसे आहे ते आचार्य येथे सांगत आहेत .पुराण प्रसिद्ध काशी क्षेत्राहून हे भिन्न आहे .मणिकार्णिका हे वेगळे स्तोत्र आचार्यांचे आहेच .येथे मणिकार्णिका हि मनाची निवृत्ती व परा शांतीच्या स्वरूपाची आहे .मनाची निवृत्ती दोन प्रकरणी संभवते .निर्विकल्प समाधी आणि निद्रेमध्ये मन पूर्ण लीन होते .जीवन्मुक्ताचे मन देह जगताच्या सत्यात्वापासून मुक्त होते .त्या मनाला व देहाला जगताचे मिथ्यत्व पूर्णपणे कळून ते त्याकडे बाधितानुवृत्तीने पाहते .वस्तुत: संसार नित्य निवृत्त असतो .तो तसाच पाहणे हे मनाच्या निवृत्तीचेलक्षण आहे .एकदा देह व जगताकडे पाहण्याची ज्ञानदृष्टी आली कि त्याच्या निमित्ताने येणारी अशांती आपोआप निवृत्त होते .अस्वस्थता खळबळ दु:ख क्रोध मोह लोभ दर्प अहंकार काम ई अशांती ची लक्षणे व कारणे आहेत हि सर्व देह तादात्म्य व जगात सत्यत्व भ्रमातून निर्माण होतात .हेच जेव्हा विचार रूप साधनाने नाहीसे होतात तेंव्हा मन निवृत्त होऊन निरपेक्ष शांतीचा लाभ होतो हेच खरे मानिकार्निका क्षेत्र .मानिकार्निका हे गंगेच्या काठावर आहे .ते क्षेत्र काशी

**क्षेत्राचाच भाग आहे .निवृत्ती व शांती कोणाच्या काठावर राहतात ? ती ज्ञान गंगेच्या प्रवाहावर राहतात .हे ज्ञान विमल आहे .आत्मज्ञान हेच ह्या ज्ञानाचे स्वरूप आहे .परोक्ष व अपरोक्ष असे ज्ञानाचे प्रकार आहेत .शब्द ज्ञान व अनुभव ज्ञान असे त्याचे अर्थ आहेत .परोक्ष ज्ञानाने विचार रूप साधना करण्याची युक्ती कळते .विचार करता करता तो विचार हाच मुमुक्षु चा स्थायी भाव बनतो .एका बाजूला जगत व देह आणि दुसऱ्या बाजूला वेदांत शास्त्र व मन ह्यांचा झगडा वर्षानुवर्ष चालतो .अनंत जन्माच्या वासना मुळे सुरवातीला देह व जगताचे वर्चस्व असते .परंतु साधनाच्या व वैराग्याच्या सातत्यामुळे पुढे पुढे वेदांत विचाराचा वरचष्मा होऊन देह व जगात मागे पडतात .साधनेचे सातत्य सांभाळल्यामुळे पुढे ती दोन्ही बाधित होऊन मन निवृत्त होते ..मन निवृत्त होताच आत्मानंद प्रगट होतो .आत्मबोध होतो .हा आत्मबोध म्हणजेच खरे काशी क्षेत्र आहे .हे मनो बोधाचे स्वरूप आचार्य सांगत आहेत**

**<u>विवेचन :-</u>** स्तोत्राच्या तीन श्लोकात सा काशिकाः निजबोध रूपः .मनाच्या च्या स्तरावर ज्या ज्या कल्पना माणूस करतो त्या त्या कल्पनापासून निवृत्त होणे आवश्यक आहे .परमार्थाच्या प्रांतात प्रवेश करतांना ह्या कल्पना मनाच्या बाहेर ठेवावे लागतात .दृश्य जगताचे अस्तित्व आपल्याला कळते पण निजबोध उत्पन्न होत नाही, तर ते अस्तित्वातच असते आणि म्हणून त्या निजबोध पर्यंत जाणे हे साधकाचे ध्येय असते .निजबोध तिन्ही अवस्थेत आहे .साधनेचे दोन प्रकार आहेत साधकारूढ साधना आणि साधनारूढ साधना .साधनारूढ साधना

करायची म्हणजे जे सिद्धांत शास्त्राने वर्णन केले आहे त्या सिद्धांतावर आरूढ होऊन त्याप्रमाणे मार्गक्रमण करणे ..निजबोधाचे ज्ञान सुरवातीला परोक्षत्वाने आणि नंतर अपरोक्षत्वाने करून घ्यावे लागते आणि "तेच मी आहे" ह्यालाच निजबोध म्हणतात .ते प्रमाणांनी सिद्ध होत नाही .म्हणून जे कळते तो निजबोध नाही .प्रमाणाने सिद्ध होणाऱ्या ज्ञानास निजबोध म्हणत नाही .प्रमाणाशिवाय जे कळते व जे कशावरही अवलंबून नाही त्याला निजबोध म्हणतात .म्हणून "ते मी आहे" ह्या अनुभवला प्राप्त होणे म्हणजे निजबोध होय .

विजातीय भेद मी देह म्हणणे ! सजातीय भेद मी जीवपणे !
स्वागत भेद मी ब्रह्म स्फुरणेहे तीनही जाणे परमात्मा !!

देह हा अचेतन जड आहे पण आत्मस्वरूप चेतन आहे .मी जर आत्मस्वरूप आहे हा विजातीय भेद आहे एका जातीचे जे आहेत त्याला विजातीय भेद म्हणतात आणि ह्याच दृष्टीने अचेतन देह व चेतन आत्मा हा विजातीय भेद आहे ."मी जीव आहे" असे म्हणणे हा सजातीय भेद आहे .बुद्धी मध्ये जे कुटस्थाचे प्रतिबिंब पडले आहे त्याला जीव म्हणतात .चैतन्याचे प्रतिबिंब हे हा सजातीय भेद आहे . मी ब्रह्म आहे असे म्हणणे म्हणजेच स्वागत भेद .हे तिन्ही भेद सहित अनुभव म्हणजे परमात्मा नाही,निजबोध नाही तर "हेच होऊन राहणे" म्हणजे निजबोध .आणि हेच काशीचे पारमार्थिक स्वरूप आहे .सर्व संत हाच बोध देतात पण प्रतिबंध हा जीवाकडून आहे .हे प्रतिबंध काढावे लागतील .हे प्रतिबंध आपलेच असतात .हे प्रतिबंध मोडून काढण्या साठी साधन कोणते हे सांगणारा हा पहिला श्लोक आहे .

मनोनिवृत्ती परमोपशांती: !!स तीर्थ वार्या मानिकार्निकाच !!

मन निवृत्ती मनाची निवृत्ती झाली कि त्या ठिकाणी शांती आहे आणि हि परम् शांती हे निजबोधाचे स्वरूप आहे .परमोपशान्तीलाच निजबोध म्हणतात .ह्यालाच काशी म्हणतात .मनोनिवृत्ती हे साधन आहे .मनाची भूमिका महत्वाची आहे. आचार्यांनी आत्मषटक स्तोत्रात मी मन नाही हि बाब विशद केली मानाशिवाय अंतक्करण हि बाब सांगितली .ज्या अन्त:क्करणाची सोबत मला आहे "त्याच्याशिवाय मी" हि बाब आपल्याला पटत नाही .पण विचारांच्या माध्यमातून मनाची निवृत्ती हे साधन आचार्यांनी सांगितले आहे .मन संकल्प विकल्प करणारे उपकरण आहे .मन हे सतत विषयासक्त असते. सुख दु:खात लोळत असते अनुकूल प्रतिकूलतेला शरण जाते ,हि सगळी द्वंद्व हि मनाची वृत्ती आहे. .ह्या वृत्तींची निवृत्ती करावयाची आहे .मनाची निवृत्ती हि अतिशय कठीण बाब आहे .पण अशक्य नाही .ह्या मनाच्या वृत्ती निवृत्ती करायची आहे आणि असे झाले तर बाह्य जगताचा भासच नाहीसा होतो .सुख दु:ख ह्या कल्पना माणसानीच निर्माण केल्या .मनोवृत्ती निवृत्त करण्यासाठी वासना युक्त वृतीनं निवृत्त करावे लागेल आणि त्यासाठी "मन करा रे प्रसन्न !! सर्व सिद्धीचे कारण !! हि साधना संतानी सांगितली आहे .आणि म्हणून समर्थांनी पण मनाला उपदेश केला आहे . मन हे अंत:क्करणा चे उपलक्षण आहे. मनाच्या निवृत्तीसाठी अंत:क्करण बाधित करावे लागेल . माणूस स्वतः जीवनाबाबत कल्पना करतो आणि ईश्वराचे नियोजन वेगळेच असते .त्याच्या नियोजानाप्रमाणेच घटना घडणार .पण आपल्या नियोजना प्रमाणे काहीच घडत नाही मग माणूस दु:खी होतो .अपेक्षा भंगाचे दु:ख येते, मग मनाची अशांतता निर्माण होते मग ह्या अशांत मनात शांतता निर्माण होत नाही .आणि म्हणून

मनाच्या व्यापापासून दूर राहण्याबाबत संत आपल्याला सल्ला देतात .निरंजन आम्ही बांधियेले घर !! मनाची रंजकता आपल्याला दूर करावी लागेल .मन जेथे जेथे रेंगाळते ते तेथून काढून घ्यावे लागेल. आत्मस्वरूप व्यापक आहे .आणि हा व्याप जास्त असला तरी तेथे शांती आहे . आणि म्हणूनच व्याप तेवढे वैभव हे निजा बोधात आपणास आढळते .मनाच्या अस्तित्वाच्या ठिकाणी व्याप तेवढा संताप असतो आणि म्हणूनच मनाची निवृत्ती महत्वाची आहे . काशीला जाताना मनाचे गाठोडे घेऊन ते फेकून देणे हे काशीचे पारमार्थिक स्वरूप आहे .म्हणून मन कोठे कोठे प्रवृत्त झाले त्याचा शोध घेऊन मग तेथून त्याला निवृत्त करण्यासाठी साधन करावे लागेल. अंत:क्करणातील प्रत्येक मनोवृत्तीकडे आम्हाला साक्षित्वाने पाहावे लागेल . मन हे अचेतन जड असताना हि वृत्ती कशी उठली हि बाब महत्वाची ठरते हि वृत्ती आत्म्याच्या अधिष्ठानावर निर्माण होतात .

मन आपणा हूनी भिन्न देखणे ! मनाचा साक्षी स्वये होणे !!

मी मन नाही पण ज्याच्या अधिष्ठानावर मन कार्य करीत आहे ते तत्व मी आहे हि दृष्टी विकसित करणे महत्वाचे आहे .तव्हाच मनाची निवृत्ती होईल .जिकडे वृत्ती धावते त्याच्या मागे जाऊ नये पण जेथून ह्या वृत्ती उठतात ते पाहता आले पाहिजे .हा निजबोध आहे .हि खरी शांतता आहे . मन भगवंताशी एकरूप व्हायला हवे .हीच काशी आहे .मन निवृत्तीत शांतता आहे .गाढ झोपेत मनाचे अस्तित्व राहत नाही त्यामुळे शांतता असते .प जागे झाल्यावर पुन्हा मनाचे व्यापार सुरु होतात .गाढ निद्रेत जो आनंद प्राप्त होतो असाच अनुभव जागृतीत घेता आला तर चीर आनंदाची प्राप्ती होईल .पण त्यासाठी जागृतीत मन बाधित व्हावे लागेल तरच जागृतीत मनाची निवृत्ती होईल ..मन निवृत्त दोन प्रकाराने होते

१) निर्विकल्प समाधी २) निद्रा

निद्रेनंतर मन पुनः जागृत होते पण निर्विकल्प संधीनंतर मन उरत नाहीत .हा दिसणारा संसार हा केवळ भास आहे .ह्या भासमान संसारात मन न रेंगाळणे ह्याला मन निवृत्ती म्हणतात .ह्यासाठी स्वतःचे कठोर परिश्रम महत्वाचे असतात .व्यवहार हा व्यवाहारासारखा करावा लागतो परंतु आतमध्ये निर्णय हा पारमार्थिक सत्तेतील हवा .व्यवहारात सर्व कर्म करीत असताना मी मात्र अकर्ता आहे हि भूमिका महत्वाची ठरते .हा पारमार्थिक निर्णय महत्वाचा आहे आणि ह्यासाठी मन निवृत्त असावे लागते .मन निवृत्तीचे महत्वाचे लक्षण म्हणजे ज्ञान दृष्टी विकसित होणे. .काही संतानी मन निवृत्तीसाठी प्राणाचा निरोधसांगितला .आणि त्याच्या माध्यमातून मनाचा लय केला , परंतु तो मनाचा लय कायमचा नसतो .असे मन पुन्हा जागृत होते व व्यापार सुरु करते .हे सामानस्थ स्थितीतील सिध्द होय .काही नष्टमानस सिध्द असतात .त्यांनी हट योगाच्या माध्यमातून मनाची निवृत्ती केलेली असते .मन मारून टाकलेले असते ते कधीच जागे होत नाही .पण बहुमानस मध्ये जीवनमुक्त असतो आणि हा जीवन्मुक्त जीवनातील सर्व द्वंद्वापासून अलिप्त असतो .तो ह्या सर्वाबाबत अनासक्त असतो .जीवन मुक्तासारखी बाधितानुवृत्ती घडवावी लागते .त्याच वेळा हे मन निवृत्त झाल्याचे आपल्याला अनुभवाला येईल .त्याठिकाणी शांती राहील, तृप्ती राहील .त्या ठिकाणी समाधान राहील आणि हाच निजबोध आहे ."चित्वदर्शनम तत्वदर्शनम" हा तो अनुभव होय .दृश्यापासून परावृत्त केलेल्या चित्ताला त्याच्या स्वरूपाचे दर्शन होते .हेच तत्व दर्शन होय .प पू डॉक्टर काका म्हणतात कि

डोळ्याच्या मागे जो पाहणारा आहे तो जागा हवा ."डोळ्याच्या मागे दृश्य बघणारे मन असते आणि हे मन अत्मातात्वाच्या सत्तेवर कार्य करीत असते .ह्या मनाला जे चैतन्य आहे त्या ठिकाणी साधक जागृत हवा .असे घडले तर डोळ्यांनी जेजे दिसेल त्याच्या प्रतिक्रिया त्याच्या अंत:क्करणा वर उमटणार नाही आणि मग तेथे फक्त तत्वाचेच दर्शन होईल ."जगामध्ये ब्रह्म दिसे उघडे" हि अनुभूती येईल .हि ज्ञानदृष्टी गुरु कृपेने विकसित होते . मन हे नेमके कशाला विषय बनवेल ह्याचा नेम नाही पण श्री गुरु कृपेने ह्यातील विषयात्व काढणे हि साधकाची जबाबदारी आहे .असे घडल्यास विषयातील विषयत्व जाऊन निर्विषयत्व येते .आणि ह्यावेळी विषयाशिवाय शांती चा अनुभव येईल आणि हि शांती न ढळणारी शांती आहे .आणि ज्यावेळी अशा शांतीचा अनुभव येतो तेथे मनाची सर्व भूमिका संपलेली असते .सापेक्ष शांतीचे निरपेक्ष शांतीत रुपांतर करायचे असेल तर मनाची निवृत्ती महत्वाची ठरते .जगताकडे बाधितानुवृत्तीने बघावे लागेल .संकल्पाना थांबवाव्या लागेल त्याच ठिकाणी सत्य संकल्प करावा लागेल .मन निवृत्ती हे साधन आहे .आणि हे साधन श्रद्धेनी स्वीकारावे लागेल .ह्या दृष्टीने आमचे मन हे काशी मधील मनकर्णिका हे क्षेत्र आहे .सर्व वृत्ती निस्तरंग झाल्यावर पार शांतीचा अनुभव येईल .ह्यामुळे "सकळ करणे जगदीशाचे" हीच दृष्टी येते .देह अहंता त्या ठिकाणी रहात नाही त्याला शांतता म्हणतात . म्हणून मी अमन होण्यासाठी मला नमन करावे लागेल म्हणजेच शरणागती

पत्करावी लागेल .ह्या स्तोत्राच्या माध्यमातून निजबोधाला पोहोचायचे आहे .

अंत:क्करणातील विचारांचा उत्छाद हे मायेचे कार्य होय .स्वरूपाचा विवर्त ते मन असे संतानी म्हटले आहे .जे नाही ते दिसणे म्हणजे विवर्त .ह्या अर्थाने सर्वत्र चैतन्यच आहे पण त्याच्या अधिष्ठानावर मनाचे अस्तित्व जाणवते .आपण मनाला विवार्ताचा दर्जा देत नाही .आणि असा दर्जा जो पर्यंत आपण देत नाही तोपर्यंत ते निवृत्त होत नाही .मनाला आकार नसतो .आणि म्हणून ते कल्पनेतीलच आहे .हा मायेचा एक कल्पित संस्कार आहे आणि हेच अज्ञान आहे .आणि हे अज्ञान हे विचारातूनच दूर करावे लागते .आणि म्हणून श्रीगुरुवर निष्ठा असणे महत्वाचे आहे .ह्यातून मन निवृत्ती साध्य होते .मन हे जड अचेतन असल्यामुळे मन हे मेलेलेच आहे .आणि म्हणून हे मेलेले मन जिवंत माणसाला मारतो आहे हे आश्चर्य आहे .ह्या आश्चर्याच्या मागे लागणे योग्य नाही .आणि ह्याची प्रतिष्ठा आपण मांडतो .मनाचे हे स्वरूप कळणे महत्वाचे आहे .हे मन सतत अविचार करते म्हणून त्याला लगेच सत् विचाराकडे प्रवृत्त करावे लागते ."मी देह" आहे हा अविचार आला कि "मी ब्रहम आहे" ह्या विचाराकडे तत्काळ मनाला न्यावे लागेल .हे खाद्य त्याला पुरवावे लागेल त्यावेळी मन निवृत्त होईल .मन हे आत्मशक्तीचे स्फूर्तीरूप अंग आहे .जाणीव नावाचे जे तत्व आहे ती जाणीव अत्मातात्वापासून आली . प्रत्येक जाणीवेच्या वेळी ते मी आहे ह्याचे भान असणे महत्वाचे आहे .मन हे माझे निजांग असे संत म्हणतात .मन हे मीच आहे असे हस्तामलक म्हणतात .आचार्यांच्या आत्मषटकात आणि हस्तामलक स्तोत्रात समन्वय आहे .आचार्य म्हणतात मन बुद्धी चित्त अहंकार मी नाही कारण हे सर्व अत्मसत्तेवर

भासते .ह्या सर्वांचे मन हे जाणीव रूप आहे स्फुरद रूप आहे आणि ते मी आहे असे हस्तामलक म्हणतात म्हणून ह्यात समन्वय आहे .मी अधिष्ठान रूपच आहे . भ्रमामुळे जाणीवरूप तत्वाला मन हे नाव आपण दिले पण त्या मनानी व्यक्तीला मारले हा संतांचा दृष्टांत आहे .हिरव्या गवताच्या कोवळ्या पात्याने स्वता:चा शेवट करावा असेच जाणीवरूप तत्वाला मन हे नाव दिले. हि बाब अज्ञानातून घडून आले .म्हणून मनाचे अधिष्ठान आत्मा आहे आणि ते मी आहे,हि दृष्टी विकसित करावी लागेल .मनाला मारून किंवा दमन करून हि बाब शक्य होणार नाही तर त्याला आत्मविचार द्यावा लागेल .सर्वत्र मीच आहे .ते मी आहे .हे निदिध्यासन महत्वाचे आहे .आणि अशा रीतीने मनाच्या निवृत्ती शिवाय शांतता नाही .आणि म्हणून बाधितानुवृत्ती विकसित करावी लागेल .आणि हे सर्व जे प्राप्त होते ते ज्ञानगंगेच्या प्रवाहावर .शांती आणि मन निवृत्तीचे ठिकाण ज्ञानगंगेच्या काठावर आहे .ह्या ज्ञानगंगेचे स्वरूप हे परोक्ष आणि अपरोक्ष ज्ञान हे आहे .म्हणजेच परोक्षत्वाने आम्ही हे ज्ञान करून घ्यायचे समजून घ्यायचे .शांतीचे निजबोधाचे स्वरूप श्रीगुरुंकडून परोक्षत्वाने समजून घ्यायचे आणि त्याचा अपरोक्ष अनुभव घ्यायचा आहे .परोक्ष ज्ञानाने आपल्याला युक्ती कळते आणि सातत्याच्या अत्माविचाराने हा मनाचा स्थायीभाव बनतो .एका बाजूला देह दुसऱ्या बाजूला जगत ह्यात देह सुखाचा विजय होतो. हा झगडा वर्षानुवर्ष चालतो वासने मुळे देह आणि जगताचे वर्चस्व राहते .पण हळू हळू आत्मविचार जसा रुजतो तसा वेदांत विचारांचा चष्मा वर राहतो .माणूस विचारप्रधान होतो देहबुद्धी पातळ आणि गौण होते .नंतर अशा पद्धतीने हा वरचष्मा प्रबळ राहिले कि देह आणि जगत मागे पडते .पण ह्या साठी अत्माविचारांचे

विचारांचे सातत्य आवश्यक आहे .मन निवृत्तीचे हेच साधन आहे .हेच काशीचे पारमार्थिक स्वरूप आहे .



## ॥ श्लोक क्रमांक २ ॥

यस्यामिदं कल्पितमिन्द्रजालं
चराचरं भाति मनोविलासम्।
सच्चित्सुखैका परमात्मरूपा
सा काशिकाऽहं निजबोधरूपा ॥२॥

***<u>प.पू. डॉक्टर काका उवाच :-</u>*** आत्म स्वरूपामध्ये जग हे जणू जादूने तयार झाल्या प्रमाणे कल्पनेतून तयार झाले आहे .हि भासणारी चर व आचार सृष्टी केवळ मनाचा खेळ आहे .हा खेळ आत्म स्वरूपावर चालतो ..ते सत् चित् आनंद रूप असलेले नीज बोधरूप आत्मतत्त्व हे काशी क्षेत्र आहे .शांकर अद्वैत मतांचा हा ठाम सिद्धांत आहे कि दृश्य जगत हि केवळ कल्पना असून कल्पना करणारे मन व ज्याची कल्पना होते ते जग मायिक आहे ,हेच माया वादाचे स्वरूप आहे .हे घडले कसे ?? तर ती माया अघटीत घटना परीयसी आहे म्हणून ! मनाने कल्पना केली म्हणून हे जगात दिसते .जशी कल्पना केली तसे ते दिसते .ह्या मताच्या अगदी जवळ पोहोचणारा विचार अत्याधुनिक शास्त्राने पुढील भाषेत मांडला आहे .It implies ultimately ,that the structure and phenomena we assure in nature are nothing but creation of our measuring and categorizing mind (Topof Plysics P 266 ) ह्या विचार मंथनातून असा अखेरचा संकेत मिळतो कि ह्या दृश्य जगात जे पदार्थ दिसतात व घटना घडताना दिसतात त्या केवळ आपल्या मोजणाऱ्या व वर्गवारी करणाऱ्या मनाची निर्मिती आहे .

चर सृष्टी मध्ये अष्टधा प्रकृती असून आचार सृष्टीत पंचधा प्रकृती असते .पंचीकरणाच्या दृष्टीने अष्टधा प्रकृतीतील मन बुद्धी व अहंकार हे अनुक्रमे अपन्चीकृत वायू ,अग्नी व पृथ्वीपासून झाले असल्याने वस्तुत : पंचभूतातच मोडतात .त्यामुळे चर अचर अशी वर्गवारी हि मनाची निर्मिती व खेळ आहे .ह्या सर्वांचा समावेश आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने वस्तू वूर्जा (Matter and Energy ) मध्ये होतो . वस्तू व उर्जा हे भास असून ते ज्यावर भासतात ते सत् चित् आनंद ब्रह्म सत्य आहे .पण हे सत्य दृश्य किंवा म्हणजे आत्मबोध हीच खरी काशी होय

**विवेचन :-** **काशीपंचकम्** हे काशीचे पारमार्थिक वैभव विषद करते व निजबोधाला प्राप्त होण्यासाठी एक साधना प्रणाली विषद करते .साधकाने साधना करता करता सिद्ध व्हावे हे प पू डॉक्टरकाकांचे आशीर्वचन आहे. ह्या गुरुवाक्यावर श्रद्धा साधकांची असायला हवी .तेव्हाच आम्ही परब्रह्माशी जोडल्या जाऊ आणि परब्रह्माशी जोडले जाणे म्हणजे नीजबोधला प्राप्त होणे आहे .ह्यामुळे जन्ममृत्युच्या आपदे पासून साधकाची कायमची सुटका होते .हे जग कल्पना आहे .हा देह काल्पनिक आहे हे आपल्याला रुचत नाही पटत नाही .हे जग मायिक आहे असे का म्हटले आहे .हा विचार महत्वाचा आहे .ब्रह्मस्वरूप हे एकमेव अद्वितीय आहे .पण आपण ह्या दृश्य पसाऱ्यात इतके रमले आहोत कि हा पसारा मायिक आहे हे आपल्याला पटत नाही .हे जगत कल्पनेतून तयार झाले आहे हेच मुळात पटत नाही .आणि हे पटवून घ्यावे लागेल .ह्या जगताचे अधिष्ठ्न सत्चितआनंद रूप आहे हे जाणून घ्यावे लागेल . हे जगत कल्पनेतून तयार झाले आहे हे साधन आणि जगताचे अधिष्ठ्न सत्चितआनंद रूप आहे हा निर्णय .ब्रह्मावर तरंग

उठला ,आणि त्या तरंगाला एकोहम बहुस्याम हा संकल्प निर्माण झाला .पण हा तरंग हाच मायिक आहे .हीच कल्पना आहे आणि ह्याच कल्पनेतून जग निर्माण झाले मग ते सत्य कसे .तरंग उठल्या बरोबर कल्पना तयार झाली आणि त्यानंतर जग निर्माण झाले .आणि म्हणून हे जगताची निर्मिती कल्पनेतून झाली .कल्पना ह्या बदलणाऱ्या असतात ,अनेक असतात ,मायिक असतात .हे कल्पनेचे विश्लेषण आहे .देहादी जगत हे काल्पानिक आहे आणि म्हणून हे अशाश्वत आहे ते नित्य परिवर्तनीय आहे .काळाच्या ओघात ते नाश पावणारे आहेत ह्याला सगुण अवतारही अपवाद नाहीत .ह्या सर्व कल्पना आपल्या स्वतःशी निगडीत नाही त्या बाह्य जगताशी निगडीत आहेत पण अभ्यासाच्या दृष्टीकोनातून ह्या कल्पना आपल्या अधिक जवळ आणाव्या .आणि मग आता आपले किती जन्म झाले ह्याचा विचार केल्यास आपल्याला आपला एकही जन्म आठवत नाही .ज्या ज्या गोष्टीची सुरवात आहे त्याचा अंत आहे .ते सांत आहे ,म्हणून ते मायिक आहे म्हणून ते नाशवान आहे ,आणि म्हणून ते काल्पनिक आहे .जे निर्माणच झाले नाही ते सर्व काल्पनिक आहे हे वास्तव आपल्याला कळत नाही कारण आपण जीव दशेत असतो .ब्रह्म अनादी अनंत आहे आणि ते मी आहे .हा निर्णय गुरु वाक्यावर आढळ श्रद्धा असेल तर होतो .दिसणारे जगत सत्य नसून मिथ्याच आहे आणि केवळ ब्रह्म सत्य आहे हा निर्णय महत्वाचा ठरतो .ह्यालाच निजबोध म्हणतात .हा श्लोक आपल्याला कल्पनेच्या मध्यमातुन कल्पनातीत करतो आहे .कल्पना करून कल्पनातीत व्हायचे आहे .जसे आकाशात वेगवेगळ्या आकाराचे ढग दिसतात व हे आपल्या गुणानुसार दिसतात .थोड्या वेळाने आकाश निरभ्र होते ह्या सारखेच जगाचे स्वरूप क्षणिक आणि मायिक आहे . .यस्य म्हणजे देह इदं म्हणजे हा .. हा देह

काल्पनिक आहे .कल्पित आहे हे आचार्यांना ह्या ठिकाणी साधकांना पटवून द्यायचे आहे .आणि म्हणून कल्पनेला जवळ करावे लागेल .देहाच्या अवस्था असतात .देहाचे रूप कायम बदलणारे आहे .ते मातेच्या गर्भात येते त्याचा जन्म होतो त्यात परिवर्तने होतात तो क्षीण होतो आणि एक दिवस ते नाश पावते .ह्या पैकी कोणत्या देहाला सत्य मानावे .बालपणी ? तरूणपणी ? वृद्धावस्थेत ? वास्तविक देहात बदल होणे हे अनिवार्यपणे घडणारी बाब आहे .अशा देहाला सत्य म्हणता येणार नाही कारण सत्य हे त्रिकालाबाधित अपरिवर्तनीय असते .त्याचा लोप,नाश होत नाही .हे सर्व निकष देहाला लागू होत नसल्यामुळे देह हा कल्पित आहे, मायिक आहे हे सिध्द होते .शरीराच्या अवस्था बदलल्या पण त्याला प्रकाशित करणारे आत्मतत्व मात्र अपरिवर्तनीय आहे .माणसाच्या तीनही अवस्था बदलल्या पण "मी" ह्या तत्वात बदल होत नाही ते तत्व दृढ आणि अपरिवर्तनीय आहे .पण ह्या बाबीची जाणीव माणसाला नसते .आणि म्हणून जसे हे देहाबाबत आहे तसेच जगताबाबत आहे .तीन देह ,तीन अवस्था ,ह्यात मी आहेच .ह्या अनुभावला जेव्हा आपण प्राप्त होतो तीच काशी आहे .आणि म्हणूनच आत्मजगतात हे जग जणूकाही काल्पनिक आहे ".जणू" ह्या शब्दाचे सौंदर्य विचारात घ्यावे लागते .ज्या प्रमाणे जादुगार वेगवेगळे प्रयोग करून आहे त्या वस्तूचे स्वरूप बदलवून दाखवितो आणि त्यावेळी आपल्याला अर्थात पाहणाऱ्याला ते सर्व सत्य आहे असे वाटते. हे वाटणे भासणे हे सौंदर्य "जणू" ह्या शब्दाचे आहे म्हणून आत्मस्वरुपात जग हे "जणूकाही" सत्य आहे हा अभ्यास महत्वाचा ठरतो .हि दृढता अंत:क्करणाच्या ठिकाणी करून जगातला दुय्यम दर्जा देणे व त्यानुसार ह्या जगात राहणे हि साधना आहे .जग हे कल्पना आहे आणि हा मनाचा खेळ आहे .हे जग सत्य आहे हा

मनाचा विलास आहे .मन हे चेतन सत्तेच्या अधिष्ठानावर कार्य करतो आहे .मनाचे सर्व विलास चेतन सत्तेच्या अधिष्ठानावर सुरु आहे .म्हणून ह्या विलासात न रमता त्या चेतन तत्वाचे अनुसंधान करावे व "ते चेतन तत्व मी आहे" हा निर्णय करावा .ह्या बोधला मी प्राप्त व्हावे हीच खरी काशी होय .मन बुद्धी चित्त अहंकार ह्या प्रत्येक स्तरावर हा निर्णय असायला हवा .ते मी आहे ह्या पार्श्व संगीतावरच माझे जीवन असावे .हेच जीवनाचे ध्रुव पद असावे .ज्या कल्पनेने आपण बद्ध झालोत त्याच कल्पनेने त्यातून सोडवणूक करून घेण्याची व्यवस्थाही शास्त्राने दिली आहे . ह्या सर्व कल्पना मिथ्या आहेत .त्या सत्य नाहीत .त्या परिवर्तनीय आहेत .आणि ह्या परिवर्तनीय जगात कल्पनेचा घडा सद्गुरूंच्या मार्गदर्शनाने फुटतो .संत सद्गुरू हे कार्य करतात व आपल्याला सद्वस्तु दाखवितात .एकाच फुलाला पाहून वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळ्या कल्पना सुचतात पण त्याबाबतची एकच कल्पना सत्य आहे आणि ती म्हणजे त्या फुलाला प्रकाशित करणारे चैतन्य एकच आहे .आणि ते मी आहे हा विचार महत्वाचा आहे . म्हणून ह्या देहाचे कौतुक नाम मात्र करावे .त्याला अवास्तव महत्व देऊ नये . म्हणून मी देह आहे हि कल्पना आहे .आणि कल्पना हि कधीच अस्तित्वात नसते .म्हणून माझा देह काल्पनिक आहे ,हि विसंवादी कल्पना आहे .मी ब्रह्म आहे हि संवादी कल्पना आहे आणि आणि ह्या संवादी कल्पनेच्या माध्यमातून विसंवादी कल्पनेचा बाध होतो .आणि कल्पनातीत होतो.संवादी कल्पनेचा आधार घेऊन विसंवादी कल्पनेचा बाध करून कल्पनातीत होणे हेच साधकाने सिद्ध होणे आहे . हाच निजबोध आहे .

वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही .वास्तव हे चैतन्य आहे ब्रह्म आहे . पण आपण ह्याकडे दुर्लक्ष करतो .आणि देहाला

,अचेतनाला प्राधान्य देतो .ह्यातून मानवाला अंतिम ध्येयाची प्राप्ती होत नाही .म्हणून जग हि कल्पना असून तो मनाचा केवळ विलास आहे ह्या निर्णयाप्रत साधकाने येणे हि साधना आहे . कल्पना करणे हि अविद्या आहे आणि हि कल्पना विराली कि अविद्या नावाची गोष्ट ह्या जगात राहत नाही तर फक्त ब्रह्म तत्व हेच सत्य राहते .आणि ते मी आहे .

ह्या जगाला उत्पत्ती स्थिती लय आहे .ह्या पसाऱ्यात आपले मन रमलेले आहे .त्यामुळे आमचे ब्रह्माचे अनुसंधान सुटते ..आणि अंतक्करण द्वैतात रमते .म्हणून कल्पनेचेही स्वरूप काय आहे हे आपल्याला कळायला हवे .एक कल्पना आमच्यात भय निर्माण करते तर एक कल्पना आम्हाला सुख देऊन जाते .तर कधी तिंच कल्पना आम्हाला आश्चर्य चाकीतही करते .एकच कल्पना जेव्हा आम्हास तीन विकारांना बळी पाडते तेव्हा नेमकी सत्य कल्पना कोणती ? म्हणून कल्पना सुद्धा खरी नाही हि बाब अंत:क्करणात ठसायला हवी .म्हणजे आपण कल्पनातीत होऊ .मनाचा विलास कमी झाला कि मनाची प्रसन्नता वाढेल .प्रसन्नतेच्या विलासा साठी मनाचा विलास कमी करावा लागेल .

सर्वांचे मूळ ! हि कल्पनाच केवळ ! तीच केलीय निर्मूळ ! ,ब्रह्मप्राप्ती !! कल्पने चे समूळ उच्चाटन विचारानेच करावे लागेल .कोणतेही कर्म करून हे उच्चाटन होणार .अवस्तावाला दूर सारून वास्तव स्वीकारणे व तेच मी आहे हे जाणणे हाच नीज बोध आहे .हेच काशी क्षेत्र आहे ."बहु जव जव होये तेंव्हा काहीच न होये ! काहीच होऊनही न राहे अवघाची तो !! हि संताची अनुभूती आहे .खुप काही झाल्यासारखे वाटते पण ते काहीच नाही कारण ह्याला प्रकाशित करणारे सत्य हे चैतन्य तत्व आहे आणि ते मला केवळ श्रीगुरू कृपेने प्राप्त होते .आणि


"ते मी आहे" .हि अनुभूती घेण्यासाठी माझे जीवनाचे प्रयोजन आहे .विसंवादी संकल्पनेतून संवादी कल्पना प्राप्त करून घ्यावी लागते .अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग !! हा अवघा रंग आहे प्रसन्नतेचा .हाच निजबोध आहे ."माया सदा प्रवाही! स्वरूप सत्तेने न राही .!! प्रवाहाने जग नित्य आहे पण स्वरूप मात्र नित्य आहे ते चैतन्य नित्य आहे आणि ते मी आहे .माउलीना सर्वत्र हरी दिसला आणि त्यांनी "चिद्विलासवाद" मांडला .आपल्याला सर्वत्र भेद दिसतो .त्यासाठी आपल्याला मिथ्यत्वाची दृष्टी कमवावी लागेल .त्याच वेळी निजबोध होईल .नाथ महाराजांनी सुद्धा मनोविलास हा शब्द वापरला आहे .संताची हि एकवाक्यता लक्षात घेऊन त्यावर निष्ठा ठेवावी लागेल .उदा व्यक्ती आरशासमोर उभा राहिल्यावर डाव्या हातातील वस्तू हि उजव्या हातात भासते पण हे सत्य नसते .प्रतिबिंब हे बिंबाच्या उलटे आहे .आमच्या जे आत्म्याचे प्रतिबिंब पडले आहे ,ते आम्हास असत भासते .देहादी जगत चेतन असल्यासरखे वाटते कारण सर्वात चैतन्याचे प्रतिबिंब पडले आहे .जगत हे तिन्ही काळात नाही पण ते तीनही काळात आहे असे भासते म्हणजेच जे सत्य आहे ते असत भासते. .ब्रह्म स्वरूप ज्ञान रूप आहे. पण देहादी जगत हे अज्ञानाने भरलेले आहे कारण हे जगात आम्हास सत्य वाटते .हे अज्ञान म्हणजेच प्रतिबिंब आहे .आहे सत् पण दिसते असत् ,आहे आनंद पण सगळीकडे दु:ख भासते .सतत दु:खा चे अनुभ येतात .ह्या वरून देहादी जगत हे प्रतिबिंब आहे असे आपणास निश्चित म्हणता येईल .हा निश्चय होणे हि साधना आहे .सत् चित् आनंद हे बिंब आहे तर असत अज्ञान आणि दुख हे प्रतिबिंब आहे .प्रतिबिम्बाकडे पाठ केल्याशिवाय बिम्बाचे स्वरूप कळणार नाही .त्यासाठी अंत:क्करण वृत्ती सतत चैतन्याकार हवी . अंत:क्करण वृत्ती सततबिंब सन्मुख हवी .तरच निजबोध होईल आणि

जगताला त्यासाठी प्रतिबिंबाचा दर्जा द्यावा लागेल आणि प्रतिबिंब हे काल्पनिक आहे .आणि असा प्रतिबिंबाला कल्पनिकतेचा दर्जा दिला तर हे जगताचे प्रतिबिंब आमच्यावर काहीही प्रभाव टाकू शकणार नाही .ह्या अर्थाने जग हे काल्पनिक आहे .आणि हि बाब हि मनालाच ठरवी लागेल .आणि प्रतिबिम्बाकडे पाठ करून बिम्बाचे ज्ञान प्राप्त करणे गरजेचे आहे .ह्याने अज्ञानाची निवृत्ती तर होतेच पण सुखरुपातही येते .आणि हाच निजबोध आहे .स्वप्नकालात दिसणाऱ्या बाबी ह्या सत्य वाटतात स्वप्नातून जागे झाल्यावर लक्षात येते कि ह्या सर्व स्वप्नातील बाबी मीच कल्पनेतून निर्माण केल्या ..तसेच हे जग दीर्घ स्वप्न आहे .त्यामुळे जागृतीतील जग हे मनाच्या आत आहे ,त्याचे सत्यत्व मनाच्या आत असते त्यामुळे हे सत्य वाटते ह्या बाह्य जगताचे सत्यत्व हे अंत:क्कर णात असते आणि म्हणून बाह्य जगात हे सत्य भासते .काल्पनिक वाटत नाही .ह्या सर्व बाबी माझ्यात आहे पण त्याचे मिथ्यत्व जाणून घेऊन त्याचा लयही मनातच करावा लागतो .ह्या मनाचे तसेच काल्पनिक जगताचे अधिष्ठान हे ब्रह्म आहे. हि दृष्टी दृढ ठेवावी लागेल .आणि ते मी आहे .हा निर्णय महत्वाचा आहे त्याचवेळी निजाबोधला आपण प्राप्त होतो

जगत हे चर आणि अचर असे विभागल्या गेले आहे .चर सृष्टी म्हणजे अष्टधा प्रकृती आहे .अचर प्रकृती हि पंचधा आहे .पंचीकर णाच्या दृष्टीने अष्टधा प्रकृतीत शरीर मन बुद्धी चित्त अहंकार येतात .अंतक्करण हे पंच महाभूतांचेच कार्य आहे .आणि पंचमहाभूते अचेतन जड आहे म्हणून अंतक्करण अचेतन जड आहे .चर अचर सृष्टीत पंच महाभूते आहेत ते अचेतन जड आहे आणि म्हणून हे जगत अचेतन जड आहे अशी घडी बसवून घ्यावी लागते .ह्या सर्वात चैतन्य व्यापून आहे

म्हणून  आम्हास हे सर्व चेतन झाल्या सारखे वाटते .जे हे चेतन तत्व आहे ते मी आहे .मनाचा विलास हा अनुभवायचा नाही .मनाच्या निर्मितीत रमून चालणार नाही  संपूर्ण  सृष्टीच मायिक आहे .मन कल्पित संसार आहे हे प्रत्येक व्यवहारात जाणवते .व्यावहारिक सत्तेत राहून पारमार्थिक सत्तेचा अनुभव घेणे महत्वाचे आहे .व्यावहारिक सत्तेत व्यवहार करताना अनुभव पारमार्थिक असावा .मी अकर्ता आहे हि भूमिका असायला हवी .म्हणून प्रत्येक नामरूपाशी व्यवहार करताना त्या सर्व नाम रूपा मागे आत्मसत्ता चैतन्याचे अधिष्ठान आहे हि दृष्टी  असायला हवी . . जगताला सत्यत्व देणे हि मनाची कल्पना आहे .परंतु ह्या कल्पनेच्या विश्वात दृष्टी मात्र अधिष्ठानाकडे असावी .दृश्य वस्तूंचे आहे पण म्हणजे अस्ति हे आत्मसत्तेच्या अधिष्ठानावर आहे  .सत् हे  अधिष्ठान आहे म्हणून अस्ति ची जाणीव आहे .आणि हे ज्ञान चित  मुळे  झाले .वस्तू बाबत चे प्रियत्व ईश्वराच्या सत्तेतील आहे आणि हे प्रियत्व आनंद स्वरूपामुळे प्राप्त झाले आहे .आनंदाच्या अधिष्ठानावर प्रियत्व जाणवते .चित च्या अधिष्ठानावर वस्तूचे आहेपण कळते सत मुळे  ह्याला अस्तित्व आहे ह्याची जाणीव होते .आता वस्तूचा नाश झाला तरी सतचित आनंद हे तत्व आहेच .ह्या तत्वाचे अस्तित्व वस्तूवर अवलंबून नाही .ह्याच वेळी सत्यात्वाचा बोध होतो .हा  ज्ञान सूर्य जो पर्यंत उगवत नाही तो पर्यंत  जगताचे अधिष्ठान सतचित आनंद आहे आणि ते मी आहे हा निर्णय होत नाही .ह्या अनुभवाला प्राप्त होण्यासाठी ज्ञान सूर्याचा उदय व्हावा लागतो .तो ज्ञान सूर्य श्रीगुरुंच्या रूपाने असतो .जगताचे व्यवहार हे अनासक्तीने व्हावयास हवे .अंत:क्करणावर बाह्य व्यवहाराच्या प्रतिक्रिया उमटायला नको . अंतक्करण नि:स्तरंग व्हायला हवे .हाच निजबोध  आहे हीच काशी आहे .ज्ञान सूर्य विद्यामानच आहे पण

प्रतिबंध जीवाने घातलेला आहे .हा प्रतिबंध काढून त्या ज्ञान सूर्याला प्राप्त होणर हाच निजबोध आहे



## || श्लोक क्रमांक ३ ||

कोशेषु पञ्चस्वधिराजमाना
बुद्धिर्भवानी प्रतिदेहगेहे ।
साक्षी शिवस्सर्वगणोऽन्तरात्मा
सा काशिकाऽहं निजबोधरूपा ॥३॥

***प पू डॉक्टर काका उवाच :-*** पाच कोषामध्ये जी विराजमान आहे ती बुद्धी हीच काशी क्षेत्रातील अन्नपूर्णा होय .तीच भवानी होय .प्रत्येकाच्या शरीरात ती राहते .सर्वांच्या अंत:क्करणात व्यापून राहिलेला अंतरात्मा किंवा साक्षी तोच शिव शिव असून त्या शिवरूप आत्म्याचा बोध हेच काशीचे खरे स्वरूप आहे .आचार्यांनी येथे भवानीचे सर्व परिचित रूप बाजूला ठेऊन बुद्धीलाच भवानी म्हटले आहे .भवानीची उपासना हीच बुद्धीची उपासना आहे .बुद्धीने सर्वही होते ! बुध्हीदाता नारायणु !! असे जेव्हा समर्थ रामदास स्वामी म्हणतात तेंव्हा बुद्धी व नारायण रूप ईश्वर ह्यांचा संबंध स्पष्ट होतो ..नारायण बुद्धी देतो हे विधान फार विचारपूर्वक पहिले पाहिजे .सर्व संतानी केलेला उपदेश हीच नारायणाची बुद्धी आहे .सत्यं वद ,धर्म चर ,ई वेदाज्ञा याही नारायणाच्या आज्ञा आहे .म्हणजे त्या आज्ञा हीच त्याने दिलेली बुद्धी आहे .ह्या अज्ञांची उपासना म्हणजेच पालन हीच खरी भवानीची उपासना आहे .सर्वांना परिचयाची शिवमूर्ती ह्या स्तोत्रातील शिव सगुण निर्गुण रूपाने एकाच आहे त्याचा बोध म्हणजे काशी

***विवेचन :-*** काशीपंचकम् चे पूर्ण सार हे काशीचे पारमार्थिक स्वरूप आहे ते म्हणजे निजबोध आणि हे आचार्य आपल्याला समजावून सांगत आहेत

.मागील श्लोकात त्यांनी मनाचा विलास व्यक्त केला .जगाची उत्पत्ती स्थिती लय आमच्या हाती नाही, पण ह्या जगताकडे बधितानुवृत्तीने बघणे हि साधना आहे .ह्या साठी ह्या जगाचे जे अधिष्ठान आहे त्याकडे अनुसंधान हवे .आणि ते अधिष्ठान म्हणजे मी आहे अशी अनुभूती येईल आणि अशी साधना करून व्यक्ती जीवन्मुक्त होऊ शकतो .ह्यालाच निजबोध म्हणतात .

तेणे समाधान झाले ! चित्त चैतन्यी मिळाले !!
नीज स्वरूपे ओळखिले ! निजा वस्तूसी !!

चित्त चैतन्यात विरून गेले हा निजबोध आहे .चित्ताचा चैतन्यात लय झाला हाच निजबोध होय . चित्त हे अंतक्करणाचे चे उपलक्षण आहे . मन बुद्धी चित्त अहंकार ह्याचा चैतन्यात लोप होणे हा निजबोध आहे .हा लय विचारानेच शक्य आहे .वैचारिक साधनाचा वापर करूनच चित्ताचा चैतन्यात लय करावा लागेल .म्हणजेच अंत:क्करणाचा चैतन्यात लय करायचा आहे . मनाच्या लयाने परम् शांती प्राप्त होईल आणि अंत:क्करणाच्या लयाने निजबोध .आणि म्हणूनच तिसऱ्या श्लोकात आचार्यांनी पाच कोषा मध्ये विराजमान बुद्धी हि काशी क्षेत्रातील अन्नपूर्णा होय .लौकिक काशी येथे अन्नपूर्णा देवी आहे .आणि तीच भवानी आहे .ह्याच भवानीचे पारमार्थिक स्वरूप म्हणजे पाच कोशामधील बुद्धी म्हणजेच हि भवानी आहे . आणि ती सर्वामध्ये आहे .सर्वांच्या अंतक्करणात व्यापून राहिलेला जो परमात्मा आहे जो साक्षी आहे तोच शिव आहे.अशा शिवरूप आत्म्याचा बोध हेच काशीचे पारमार्थिक स्वरूप आहे .ह्या श्लोकाच्या माध्यमातून आचार्य उपासना सांगत आहेत .हि उपासना बुद्धीची आहे ..निजबोध हा बुद्धीशिवाय होत नाही,पण बुद्धीला निजबोध होत नाही ,हि शास्त्राची मांडणी आहे .कारण बुद्धी हि

आत्म्याच्या अधिष्ठानावर कार्य करते . ज्याप्रमाणे मुलगा हा वडिलांचे बारसे जेऊ शकत नाही ,त्याच प्रमाणे बुद्धीला आत्मज्ञान होऊ शकणार नाही .कारण बुद्धी हि प्रकाश्य आहे आणि आत्मा हा प्रकाशक आहे .बुद्धी निश्चय आत्मज्ञान ! ब्रह्म रूपे व्हावे आपणा आपण !!

बुद्धीचा निश्चय हेच आत्मज्ञान आहे .आपणच आपल्याला बघायचे हि ब्रह्मरुपता आहे .हे सर्व बुद्धीच्या निश्चयाशिवाय शक्य नाही .म्हणून बुद्धीचा ज्यावेळी "मी ब्रह्म आहे" असा निश्चय होतो हेच खरे फळ आहे .ह्या निश्चयाला सहजता आली कि बुद्धी निवृत्त होते .

निश्चयाचे बळ ! तुका म्हणे हेची फळ !! असे संतानी म्हटले आहे .ज्या वेळी मी इंद्रियांच्या अधीन होतो ,मी स्वतः ला मन समजू लागतो त्या वेळी मी ब्रह्म आहे हा बुद्धीचा निश्चय महत्वाचा ठरतो .सुंदर दृश्याने डोळे सुखावतात तर वाईट दृश्याने मन नाराज होते ह्या वेळी आपण इंद्रियाच्या अधीन झालेले असतो.आणि ह्यावेळी जे सुख किंवा दु:ख झाले ते आम्हाला सत्य वाटते .पण ह्याच वेळी ""इंद्रीयाधिनतेने होणाऱ्या सुख दु:खाशी माझा काही संबंध नाही. तू मन इंद्रिये नसून तू आत्मा आहे तू चैतन्य आहे तू ह्या सर्वांचा प्रकाशक आहे ,तू आहे म्हणून मन इंद्रियाचे कार्य सुरु आहे ,आणि म्हणून तुला सुख दु:खाचे ज्ञान होते आहे ,हि प्रक्रिया सुद्धा आत्मसत्तेच्या जोरावर आहे त्याचा तुझ्याशी भौतिक दृष्टीने काहीही संबंध नाही तू मुळचा सुखरूप आहेस"" असा असा बुद्धीने जर निर्णय दिला तर आपण इंद्रियांच्या अनुभवापासून वेगळे राहू शकतो .आणि तेव्हाच आम्ही आत्मानुसंधानात राहू . पण ह्या साठी हे सर्व निश्चयाचे कार्य बुद्धीला करावे लागेल .अशी बुद्धी हि भवानी माता अन्नपूर्णेचे रूप आहे .आणि म्हणून बुद्धीची उपासना महत्वाची ठरते .


बुद्धीच्या माध्यमातून जरी आत्मज्ञान व्हायचे आहे तरी तत्व हे श्रेष्ठ आहे .इंद्रिय नेणेती ज्यांचे घर ! जे मना वचना अगोचर !!
बुद्धीशी न कळे ज्यांची मेर ! ऐसी निर्विकार निजवस्तू !! असे संत म्हणतात .असे जे तत्व आहे ते बुद्धीशिवाय कळत नाही हे खरे असले तेरी ते बुद्धीला काळत नाही हेही सत्य नाकारता येत नाही .हि शास्त्राची मांडणी साधकाने लक्षात घ्यावी . बुद्धीने निश्चय करावा कि "मी ब्रह्म आहे" .पण हा निश्चय कायम डळमळीत होतो त्यासाठी हा निश्चय सतत करावा .बुद्धी हि निश्चयाकार राहण्यासाठी सतत श्रवण महत्वाचे आहे.वेदांत तात्पर्याचा जो निर्णय आहे त्याला श्रवण म्हणतात .निर्णय आहे म्हणून बुद्धी चे महात्म्य आहे .वेदांताचा निर्णय ""जीव-ब्रह्म ऐक्य"" हा आहे .म्हणून श्रवण हे निर्णयाच्या अनुषंगिक व्हायला हवे .श्रवण काळी हाच निर्णय बुद्धीचा व्हावयास हवा .त्यानंतर ह्या निर्णयाचे मनन व्हायला हवे .मी ब्रह्म आहे हा निर्णय झाला कि त्याचे निदिध्यासन व्हायला हवे .मग त्या निर्णयाचे अनुभवात रुपांतर व्हायला हवे .व त्यानंतर ह्या निर्णयाला सहजता आली कि बुद्धी निवृत्त होते आणि तेथे फक्त आत्मानुभव प्रगट होतो .निजबोध प्रगट होतो .हि भवानीची अर्थात बुद्धीची उपासना आहे .अशा रीतीने बुद्धी प्रसन्न झाली कि सद्गुरू आम्हास बोध प्रदान करतात .हि बुद्धी पंचकोषात राहते .आत्मबोधा पर्यंत जाण्यासाठी हि प्रणाली आहे .पंचकोषाच्या गुहेत आत्मा राहतो हि वेदांताची घडी आहे आणि ह्या मधील आत्म्यापर्यंत पोहोचायचे असेल तर बुद्धीचेच सहाय्य लागेल .पाच कोषाचे जे स्वरूपावर आवरण आहे, ते सोलायला आम्हाला बुद्धी ह्याच साधनाची

आवश्यकता आहे ..बुद्धीने हे कोष  सोलावे लागतात .अन्नमय मनोमय प्राणमय विज्ञानमय आणि आनंदमय कोष  असे ते पाच कोष  आहेत  . अंत:क्करणातील साक्षीरुप शिवाचा बोध करून घेणे हे बुद्धीचे कार्य आहे. शिव हाच बुद्धीचा प्रकाशक आहे .बुद्धीच्या प्रकाशकाचा शोध बुद्धीनेच घ्यावा लागतो. आणि तो प्रकाशक मी आहे असा निर्णय घेत जायचा हीच भवानीची उपासना आहे.भवानी शक्तीचे रूप असून शिव हा अंतरंगातील साक्षी आहे .ह्या शक्तीची उपासना करून शिवरूप होणे हि बाब महत्वाची ठरते .हे बुद्धीच्या  माध्यमातून शक्य आहे .शिवाचा शोध हि साधना आहे पण शिवरूप होणे हि साधनेची पराकाष्ठा आहे . हि बुद्धीची उपासना आहे .बुद्धीने शिवाच्या जवळ बसने म्हणजेच सतत शिवाचे निदिध्यासन करणे .समर्थ म्हणतात बुद्धिदाता  नारायणु !! बुद्धीने सात्विक  गुणाचा परिपोष करता करता मी आत्मा आहे हा बुद्धीचा निर्णय होतो .सत्कर्म करता करता चित्त शुद्ध होईल उपासनेने ते शांत होईल आणि अशा शांत झालेल्या चित्तात चैतन्याचा लय होईल .असा नराचा  नारायण होईल .ह्यासाठी आपल्याला आपली बुद्धी संताना गहाण  टाकावी लागेल. म्हणजेच संत वाक्य गुरु वाक्य ह्यावर नितांत श्रद्धा ठेवावी लागेल .म्हणजेच आमच्या बुद्धीने संतांच्या चालीने चालावे ,संतांच्या बोलीने बोलावे ,""बहुत जनित सुखे सौख्य होणार नाही"" .हि संतांची दृष्टी आहे ह्यावर विश्वास निष्ठा ठेऊन विषयात सुख नाही हा आमचा निर्णय होणे महत्वाचे आहे आणि मग ज्यात सुख आहे असे संतानी सांगितले त्याचाच पाठपुरावा करणे महत्वाचे आहे . ह्यामुळे सुखासाठी सर्व बाह्य विषयावर अवलंबित्व सुटेल .आणि मग ""सुखाचे

सुख ,श्रीहरी मुख !!"" हा निर्णय पक्का होईल .आणि म्हणून ""माझ्या मते"" किंवा ""मला असे वाटते"" ह्या वाक्यापासून ह्या वृत्तीपासून साधकाने सावध असायला हवे .आणि शास्त्र संस्कारित बुद्धीने विचार करून स्वरूपाला जाणून घ्यावे लागेल .आणि स्वरूपाचा बोध झाला कि मग तेथे बुद्धी निवृत्त होते .सर्व सामान्य माणसाची वृत्ती हि वासनानुसारी असते . आणि ह्या वासनाच मग बुद्धीला निर्णय घ्यायला भाग पडतात .देह बुद्धीच्या अनुषंगिक प्रपंचातील निर्णय असतात .देहबुद्धी मुळे निजबोधाचा निर्णय दूर जातो शास्त्राच्या श्री गुरूंच्या आज्ञा पालनाने हा निर्णय जवळ येतो .हि बुद्धीची उपासना आहे .ह्या उपासनेतून शिवरूप होणे हा निजबोध आहे हि काशी आहे .आत्मा-अनात्मा ,सार-असार नित्य-अनित्य ह्या सर्वांचे ज्ञान बुद्धीला होते. आणि हे ज्ञान कूटस्थ चैतन्यामुळे हे ज्ञान होते .बुद्धी हि प्रकाश्य व आत्मा हा प्रकाशक आहे .बुद्धीला आत्मज्ञान होत नाही पण कुटस्थ चैतन्यामुळे तिला जे ज्ञान होते त्यामुळे ती जाणीव कळा आहे .कारण तिला आकार नाही .पण जाणीव आहे .बुद्धीत शुद्ध जाणीव असावी .ते मी आहे हा निर्णय सतत बुद्धीचा असावा .तरच आपण शिवरूप होऊ .परमार्थात सर्व बाबी ह्या जीवाच्या बुद्धीनेच कराव्या लागतात .उपदेश जीवाला असतो बुद्धी ला केला आहे . ""बुद्धी दे रघूनायका"" असे जेव्हा समर्थ म्हणतात तेव्हा हि बुद्धी मोक्ष बाबत आहे .सदबुद्धी बाबत आहे .निश्चयात्मक आत्मबुद्धी बाबत आहे .हि बुद्धी देह बुद्धी बाबत नाही आणि म्हणून "देह बुद्धी ते आत्म बुद्धी करावी" असे समर्थ म्हणतात .बुद्धीला परोक्षत्वाने आकलन होणे ह्या बाबत आहे .व्यवहारात सुद्धा बुद्धीतील प्रकाश हा शब्द

प्रयोग दृढ आहे .हे तत्व आपण मान्य केले आहे .हा प्रकाश म्हणजेच चिदाभास म्हणतात .आणि ज्ञान चिदाभासाला झाले आहे .अनेक जन्मापासून विविध वासनांनी युक्त हया बुद्धी मध्ये ""मी देह"" हा निर्णय असतो .ती भ्रांतीने परिपूर्ण असते .अशी बुद्धी श्री गुरूच्या अनुग्रहाने शास्त्रानुसारी होते .अनुग्रह काळी श्रीगुरू शास्त्र संस्कार करतात .अशी शास्त्रानुसरी जी बुद्धी आहे तिला प्रगल्भ बुद्धी म्हणतात.ज्या बुद्धीने सत्य-असत्य विवेक करता येतो दृक्-दृश्य विवेक आत्म अनात्म सार-असार विवेक करता येतो तीच बुद्धी बुद्धिमान आहे .जिला आत्मतत्त्व गवसले तीच बुद्धी बुद्धिमान आहे .बुद्धीचा वापर हा फक्त सत् तत्वासाठीच झाला पाहिजे .सद्विचाराच्या प्रभावानेच अविचार लोळण घेतो .सद्विचारांच्या सातत्याने अविचार, अवास्तव विचार, धाराशायी होतात .आणि मग फक्त वास्तव राहते आणि हे वास्तव म्हणजे ""मी ब्रह्म आहे"" .आणि हयाच वास्तवात राहणे हयालाच आत्मानुभव, ,निजबोध म्हणतात . आणि हा निर्णय बुद्धीच्या माध्यमातून करावा लागतो म्हणून विसंवादी अहं (मी देह ,मी कर्ता ,मी भोक्ता ) ला संवादी अहम् (मी ब्रह्म आहे मी अकर्ता आहे ) ने छेद दयावा .म्हणून ""अहं"" ला ""सः" मध्ये विलीन व्हायचे आहे .हया साठी जीवाने बुद्धी उपाधीचा त्याग करायचा आहे .जीवासाठी प्रथम बुद्धी हि साधन जरी असली तरी ज्ञान झाल्यावर ती पण उपाधीच ठरते .हया उपाधीला बाजूला सारल्या वरच जीवाचे शिवाशी ऐक्य होणार आहे .सः शी ऐक्य होऊन बुद्धी निवृत्त होणार आहे .हे सर्व बुद्धीने करायचे व ऐक्य जीवाने करायचे हि शास्त्राची मांडणी आहे .हयालाच त्वं पद वाच्य जीवाने आपल्या उपाधीचा

त्याग करायचा .त्वं पद वाच्य जीव आहे आणि त्वं पद लक्ष्य कूटस्थ आहे .वाच्यार्थाने त्वंपद जीव आहे आणि लाक्षर्थाने तो कूटस्थ आहे .जीवाने आपल्या उपाधीचा त्याग करायचा आणि तत्वाशी ऐक्य साधायचे हे बाध सामानाधीकरण आहे .बुद्धीचा बाध केल्याशिवाय ऐक्य होत नाही .कूटस्थ हा चैतन्य आहे .जीवाने उपाधीचा त्याग केला कि तोच शिव होतो .आत्मरूप होतो .हाच निजबोध आहे .हाच आत्मबोध आहे .हाच शिव सर्वाठायी आहे .व्यष्टी  चा विचार करताना मी आत्मरूप आहे आणि माझ्यातील चैतन्य हे चराचरात व्यापून आहे आणि तेच मी आहे हा जो शिव आहे हा साक्षी रूपाने सर्वामध्ये आहे .तो मी आहे ह्यालाच निजबोध म्हणतात .



## || श्लोक क्रमांक ४ ||

काश्यां हि काशते काशी
काशी सर्वप्रकाशिका।
सा काशी विदिता येन
तेन प्राप्ता हि काशिका ||४||

**प.पू डॉक्टरकाका उवाच :-** "" काशृ दिप्तौ ""अशी काशीची एक व्युत्पत्ती आहे .तिला अनुसरून आचार्य काशीचे वर्णन करतात .बुद्धी व बुद्धीस्थ चिदाभास असे दोन्ही मिळून दृश्य जगताचे प्रकाशन करतात .हा चिदाभास कूटस्थ चैतन्याचा म्हणजे आत्म्याचा असतो .आत्मा स्वयंप्रकाश आहे .हा स्वयं प्रकाश आत्मा प्रथम शुद्ध तत्वाच्या स्वच्छ बुद्धीत प्रकाशित होऊन चिदाभास -ज्ञानेंद्रिय -अंतक्करण वृत्ती या क्रमाने बाह्य पदार्थांचे प्रकाशन करतो किंवा त्याचे ज्ञान करून देतो .तो आत्माच काशी आहे .ह्या काशीचे ज्ञान ज्याला झाले त्याची काशीयात्रा खऱ्या अर्थाने सफल झाली पूर्ण झाली .फार फार पूर्वी काशीला जाणारा यात्रेकरू परत येण्याची शक्यता फार कमी असे .अत्माकाशीची यात्रा करणारा पुन्हा देहात परत येत नाही हे मात्र नक्की .

**विवेचन :-** देहरूपी काशीत आत्मा प्रकाशित होतो .हा आत्मा सर्वांना प्रकाशित करणारा आहे . आणि त्यामुळेच बुद्धीतील चिदाभास जाणला जातो. जे जे आपण जाणतो ते सर्व आत्म्याच्या सत्तेवर.""परतोनी

पाठीमागे ठाके"" असे संत म्हणतात .बुद्धी मध्ये जो चिदाभास आहे तो दृश्य जगताचे प्रकाशन करतो चिदाभास म्हणजे आत्माचे चैतन्याचे बुद्धी मध्ये पडलेले प्रतिबिंब आणि हा चिदाभास वृत्ती ज्ञानाला प्रकाशित करतो .चिदाभासामुळे देह चेतन असल्यासारखा वाटतो .आणि हाच चिदाभास मग मी देह आहे, मी मन, बुद्धी, चित्त, अहंकार आहे असे समजतो .तो अचेतन जड देहात रमतो.दृश्य जगतात रमतो .अशा वेळी श्रीगुरुंचे आगमन होते आणि श्रीगुरू सांगतात ""तू देह नाहीस तू ज्ञानेंद्रिय नाहीस तू कर्मेंद्रिय नाहीस .तर तू मूळ चा कूटस्थ आहेस तू आत्मा आहेस .तू जड नाही तू चेतन आहेस"" .आणि मग चिदाभासाला ह्याचे ज्ञान होते कि मी मूळ चा कूटस्थ आहे .मी ज्ञानेंद्रिय किंवा कर्मेंद्रिय नाही मी अंत:क्करण नाही तर ""चिदानंद रूपः शिवोहम शिवोहम"" हि अनुभूती येते .कूटस्थ हा चिदाभासरूप आहे .""मी कूटस्थ आहे"" असे चिदाभासाला प्रचिती येते .आणि ह्या चिदाभासाने बुद्धीला प्रकाशित केले .आणि म्हणून ज्ञानेन्द्रीयाला येणारे अनुभव हे कुटस्थाच्या आधारे येतात .कारण मीच कूटस्थ आहे मी आनंद रूप आहे .देहाच्या संदर्भात ह्याला कूटस्थ म्हणतात .पण चराचराच्या संदर्भात जे चैतन्य माझ्यात आहे तेच सर्वदूर व्याप्त आहे .म्हणून मी ब्रह्म आहे हे ज्ञान बुद्धीला झाले बुद्धीने निर्णय घेतला आणि बुद्धी निवृत्त झाली हि शास्त्राची घडी लक्षात ठेवणे महत्वाचे आहे .व्यवहारकाळी बधीतानुवृत्ती तयार होणे महत्वाचे आहे .साधकाला जग बाधित करावे लागते .अनासक्त वृत्तीने जगात राहायचे आहे .जीवनातील विविध घटनांकडे साधकाला त्रयस्थ

वृत्तीने बघता आले पाहिजे .अंत:क्करणावर कोणतीही प्रतिक्रिया उमटणार नाही ह्याबाबत सजग राहावे लागेल .ह्या वेळी मग जीवनात फक्त आणि फक्त आनंद च असेल .ह्या चिदाभासाने मागे कुटस्थाकडे पाहिले आणि मी कूटस्थ आहे हि अनुभूती चिदाभासाने घेतली .ह्यालाच निजबोध म्हणतात आणि हीच काशी आहे .हा निजबोध श्रीगुरुंच्या कृपेने शक्य होतो .



## ॥ श्लोक क्रमांक ५ ॥

काशीक्षेत्रं शरीरं त्रिभुवनजननी व्यापिनी ज्ञानगंगा
भक्तिः श्रद्धा गयेयं निजगुरुचरणद्ध्यानयोगः प्रयागः।
विश्वेशोऽयं तुरीयः सकलजनमनः साक्षिभूतोऽन्तरात्मा
देहे सर्वं मदीये यदि वसति पुनः
तीर्थमन्यत्किमस्ति ॥५॥

**<u>प पू डॉक्टरकाका उवाच :-</u>** ह्या श्लोकात पुढील रूपके केली आहेत

| | | |
|---|---|---|
| शरीर | - | काशीक्षेत्र |
| व्यापक ज्ञान | - | गंगा |
| भक्ती व श्रद्धा | - | गया |
| श्रीगुरू चरण ध्यान | - | प्रयाग |
| तुरीय | - | विश्वेश्वर |

हे काशी पंचाकाचे रूपक फार महत्वाचे असून स्टूल काशी यात्रेमध्ये समाधान न मानता ह्या काशी क्षेत्रात स्वतः ला पूर्णपणे झोकून द्यावे .ह्या पाचांचा परस्पर संबंध असा आहे -मानवी देहात श्रद्धा व भक्ती ह्यांचे सहाय्याने श्री गुरु वाक्यरूप चरणांचे ध्यान केले असता तुरीय स्वरूप ब्रह्म ज्ञानाचा अनुभव येतो .ह्या सर्व गोष्टी एका मानवी शरीरात काशी क्षेत्र कायमचे वास्तव्याला असते .सर्व विश्वाला व्यापणारी त्रैलोक्याला जन्म घालणारी ज्ञान गंगा हि ह्या क्षेत्राची गंगा नदी होय .भगवंताविषयी पूर्ण श्रद्धा व परा भक्ती हेच गया क्षेत्र समजावे .आपल्या

श्री गुरूंच्या चरणाशी ध्यानाने योग साधणे हेच तीर्थराज प्रयाग मानावे .जागृती स्वप्न सुषुप्ती ह्या तीन अवस्थांचा साक्षी किंवा तुर्य तोच ह्या क्षेत्रातील सदाशिव होय .तोच सर्व प्राणीमात्रांच्या अंत:क्करणाचा साक्षी असलेला अंतरात्मा होय .हे सर्व अनायासे माझ्या शरीरातच उपलब्ध असता ह्याहून आणखी पवित्र क्षेत्र ते कोणते ??मानव देह सोडून इतर शरीरात काशी क्षेत्र नाही कारण श्रद्धा भक्ती श्रीगुरू ई उन्नत कल्पना इतर शरीरात नसतात .म्हणून धन्य धन्य हा नरदेहो असे संत त्याविषयी म्हणतात .परमेश्वराच्या ठिकाणी जेंव्हा प्रथम स्फुरण झाले तेंव्हा अहं हे सविशेष ज्ञान उत्पन्न झाले ."" स अकामायत ,स ईक्षत ,स सृजत ,असा तो क्रम आहे .ह्या सविशेष ज्ञानातून हे जगत निर्माण झाले आहे .गयेला श्राध्द कर्म केले कि पुन्हा श्राद्ध करावे लागत नाही असा संकेत आहे .श्रद्धा व परा भक्तीच्या प्रयागात जीव आत्मरूप झाला कि तो पुन्हा जन्माला न आल्याने त्यांचे पुन्हा श्राद्ध करावे लागत नाही अंतक्करण वृत्ती व श्रीगुरुंचे चरण ह्यांचा संगम हा सर्व श्रेष्ठ संगम असल्याने त्याला प्रयाग तीर्थाचे मूल्य आहे .जागृती सुषुप्ती व् स्वप्न ह्या जीवाच्या तीन अवस्था आहेत .त्या आत्म्याच्या सत्तेवर बुद्धिस्थ चिदाभासाला होतात .आत्मा त्यापासून अलिप्त म्हणजे सदा शिव असतो .तोच सर्व प्राणि मात्रामध्ये आत्मरूपाने राहतो

**विवेचन :-** साधना कुणाला करायची आहे ? हा प्रश्न महत्वाचा ठरतो .साधन हे अंत:क्करण वृत्तीला करायचे आहे हे त्याचे उत्तर आहे .ते देहाने किंवा नुसते मानाने सुद्धा करावयाची बाब नाही . अंत:क्करण चे चारही घटक मन, बुद्धी, चित्त, अहंकार, जे चारही घटकांनी बनले त्याला साधन करायचे आहे हे शास्त्र आहे .वृत्ती हि सत्व गुणांची आहे ,बुद्धी हि शुध्द सात्विक आहे म्हणून त्यात कुटस्थाचा प्रकाश पडतो. कुटस्थाचा प्रकाश

बुद्धीत पडल्यामुळे मग सर्व क्रियाना प्रारंभ होतो इंद्रियांच्या माध्यमातून तो बाहेर जातो आणि वृत्ती ज्ञान गोळा करतो .मनाच्या माध्यमातून तो बाहेर जातो तेंव्हा तो संकल्प विकल्प करतो,चित्ताच्या माध्यमातून जेंव्हा तो कार्य करतो तेंव्हा तो साठवणुकीचे काम करतो .बुद्धीच्या माध्यमातून काम् करतो तेंव्हा तो निर्णय घेण्याचे काम करतो .आणि अहम च्या माध्यमातून तो मी आणि माझे हि अनुभूती घेतो .म्हणजेच हा चिदाभास माध्यमातून कार्य करतो .आणि आपल्या शरीराला अंत:क्करणाला

कृतीशील बनवितो .मग ह्या चिदाभासामुळे ज्ञान होते .ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून बाह्य जगताशी तो तदाकार होतो मग आपल्याला जगताचे ज्ञान होते .आत्म्याच्या सत्तेवर हा देह कार्यरत होतो आणि ती आत्मसत्ता मी आहे हा जेव्हा बोध होतो हाच निजबोध होय .हयासाठी देह इंद्रिय बाधित करण्याची आवश्यकता आहे .निजबोध झाल्यावर जीव हा देहादी व्यापारापासून दूर होतो .माझ्यातील आत्मतत्त्व हे चराचरात आहे आणि हे तत्व मी आहे हि अनुभूती आहे .आणि म्हणून मी ब्रह्मरूप आहे हि अनुभूती आहे .हा बुद्धीचा निर्णय आहे हा निजबोध आहे .निजबोध होण्याची व्यवस्था ह्याच देहात आहे. आणि हीच काशी आहे. पण ह्या काशीला जाण्यासाठी श्रीगुरूंची सोबत आवश्यक आहे .हया निजाबोधाबाबत श्रीगुरू साधकाला विविध प्रकारे मार्गदर्शन करतात .श्रीगुरुंचे सहज बोलणे हा निजबोधच असतो .पण अविद्याची पकड एवढी असते कि ह्या बाबींचे चटकन आकलन होत नाही .आणि ह्या निजाबोधासाठी साधकाने स्वतः ला जसा पतंग दिव्यावर स्वतःला झोकून देतो त्याच प्रमाणे .झोकून द्यावे लागते .पतंग हा स्वतःचे अस्तित्व मिटवून टाकतो .त्याच प्रमाणे साधकाने स्वतःला वाहून घ्यावे लागते .तरच ह्या जन्माचे सार्थक होते इंद्रीयाविण स्वानंदू ! विषयावीण परमानंदु ! ऐसा करती निजबोधू !

अगाध साधू जग महिमा !! हि अनुभूती केवल मी आनंदरूप आहे म्हणून होते . आनंद हे स्वरूप असल्यामुळे विषयावाचून आनंद हा अनुभव आहे .विषयाविण स्वानंदला निजबोध असे म्हणतात .हा निजबोध श्रीगुरु कृपेशिवाय येत नाही .आणि म्हणून आचार्यांनी ह्या पाचव्या श्लोकात त्यांनी रूपक दिले आहे .आणि नेमके काशी क्षेत्र म्हणजे काय हे त्यांनी पाचव्या श्लोकात वर्णन केले आहे .


शरीर काशी क्षेत्र आहे .ह्या काशी क्षेत्राला जाणण्यासाठी आम्हाला व्यापक आणि पर्याप्त ज्ञान लागेल .काशीला गंगा आहे हि व्यापक ज्ञानाची गंगा आहे .चराचरातील व्यापक ज्ञानरूप तत्व परोक्ष ज्ञानाने कळते आणि श्रीगुरुंच्या कृपेने आम्ही अपरोक्षानुभूती घेऊ शकतो .आणि म्हणून हे व्यापक ज्ञान म्हणजे गंगा आहे .काशी क्षेत्रात गया आहे .हि गया भक्ती आणि श्रद्धा ह्यांचे प्रतिक आहे .गयेला जाऊन स्वतःचे श्राद्ध करायचे असा एक प्रघात आहे .म्हणजेच ह्या देहानंतर मला पुन्हा जन्म नाही .""मन हा मोगरा अर्पुनी ईश्वारा पुनरपि संसारा येणे नाही .!!""हा देहरूपी मोगरा जेव्हा श्रीगुरुंच्या चरणी अर्पण केला तेंव्हा आता ह्या संसारात पुन्हा येणे नाही ह्या देहाला पुन्हा जन्म घेणे नाही .मला जर निजबोध करून घ्यायचा असेल तर भक्ती आणि श्रद्धा अत्यंत आवश्यक आहे .म्हणजेच केवळ श्रीगुरूंची भक्ती आणि श्री गुरूंवर श्रद्धा ..असा श्रीगुरू चरणाचा ध्यास हे प्रयाग क्षेत्र आहे ..विश्वेश्वर म्हणजे जो ह्या तीनही अवस्थेच्या पलीकडे आहे ,जो साक्षी आहे तो मी आहे तोच सदाशिव आहे .मी साक्षीरूपाने विश्वेश्वरच आहे .ह्यालाच निजबोध म्हणतात .ह्या रूपकाच्या माध्यमातून आम्हाला निजाबोधला प्राप्त व्हायचे आहे .त्यासाठी श्रीगुरूंची श्रद्धा पूर्वक भक्ती महत्वाची आहे .श्रद्धा म्हणजे सत् ची धारणा .सत् चा विचार अंत:क्कारणात सतत

असणे ह्यालाच श्रद्धा म्हणतात .सत् वस्तू एकच आहे ते म्हणजे ब्रह्म आहे .माझे सद्गुरू हे ब्रह्मच आहे .ते सगुण साकार रुपात श्रीगुरुंच्या रुपात अवतरले आहे .अशी भावना हीच श्रद्धा आहे . असे सगुण साकार ब्रह्म ह्या अज्ञानी जीवाला ब्रह्मरूप करणार आहे. ह्या भावनेनी जे भक्ती करतात त्याला श्रद्धा म्हणतात ."चालते ज्ञानाचे बिंब अवयवही सुखाचे कोंब" असे माझे श्रीगुरू आहेत.निजाबोधासाठी श्रीगुरू आणि त्यांचेवरील नितांत श्रद्धा व ध्यान महत्वाचे आहे .म्हणून श्रीगुरुबाबत श्रद्धा आणि त्यांचेच ध्यान हे महत्वाचे आहे . श्रीगुरू हे चालते बोलते ज्ञानाचे बिंब असल्यामुळे ब्रह्मविद्या हि त्यांच्याच आधाराने आकलन होते .सहज बोलणे हितोपदेश !! त्यांच्या चालण्या बोलण्यातून शिष्याचे शाश्वत कल्याणाचीच योजना असते .हि दृढ श्रद्धा आहे .श्रीगुरू शिष्याला मोक्ष देतात .जो मूळचा मी सुखरूप आहे मला सुखासाठी कशावरच अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही असे श्रीगुरू शिष्याला लीलया अनुभूती देतात .साधकासाठी श्रीगुरू हे अनन्य श्रद्धेचे स्थान असावे .ज्या ज्या बाबींवर आमची श्रद्धा असते त्यावर आमचे अवलंबित्व असते . श्री गुरुशिवाय कल्याण नाही हीच अनन्य श्रद्धा आहे .दुसरा विषयच नाही .श्रीगुरू हे चालते बोलते परब्रह्म आहे हे श्रद्धेने स्वीकारावे .कारण सद्गुरूच मला अरुपाचे रूप दावणार आहेत .औषध ज्या प्रमाणे घेऊन आम्ही आमचा रोग दूर करतो त्याच प्रमाणे श्रीगुरू हे आमचा भवरोग दूर करणारे आहे .पांथस्थ जसा विशाल वृक्षाच्या दाट छायेत बसतो त्याच प्रमाणे श्रीगुरुवर श्रद्धा हि शिष्याकरिता सावली सारखी आहे ..हा जीव त्रिविध तापाने पोळला आहे ,जन्म मृत्युच्या चक्रात त्रस्त झाला आहे ,असा हा जीव श्री गुरूंच्या छायेत विसावा घेतो .तथापि ही सावली अनित्य, अस्थिर, चांचल्य, आश्रय, नाश, ह्या दोषापासून मुक्त

आहे .श्रीगुरुंनी दिलेले साधन हे साधकाला मिळालेली अखंड सावली आहे .हीच निष्ठा आहे .श्रद्धा आहे .आणि म्हणून आम्हाला जर काशीला जायचे असेल तर श्रीगुरुवरील श्रद्धा भक्ती आणि त्यांचे ध्यान हे महत्वाचे आहे .तरच निजबोध होतो . श्रीगुरुंनी दिलेला विचार ज्ञान तत्वज्ञान नाम साधन हि श्रीगुरूंची सावली आहे .ते आनंदमूर्ती आहेत .आनंदघन आहे आणि हि सावली आम्हाला आनंद रूपातच देणार आहे .ह्या सावलीची निष्ठा आम्हाला सांभाळली पाहिजे .श्रीगुरुंच्या विचारांच्या साधनाच्या संगात राहिले पाहिजे .ह्यालाच श्रीगुरू चरणाचे ध्यानही म्हणतात .कारण चरण हे अध्यात्मिक वाटचालीचे प्रतिक आहे .आणि म्हणून माझे श्रीगुरू ज्या सत्याचा मार्ग आचरीत आहेत त्याच सत्याचा मार्ग मी आचरणे हीच निष्ठा आहे .श्रीगुरुनाच जर ज्ञानाचा विषय केला तर ज्ञानाचे ज्ञातृत्व जाते आणि ते सुद्धा श्रीगुरू प्रमाणे निरुपाधिक होते .माझे श्रीगुरू कसे आहेत ते कसे बोलतात ,ते मला काय सांगतात ,मला काय पद्धतीचे ब्रह्मज्ञान ते देत आहेत त्यांनी कोणत्या पद्धतीने मिथ्यात्व दृष्टी कमावली आहे ,त्यांची अधिष्ठान दृष्टी कशी आहे ,तीच माझी दृष्टी कशी होईल असा सतत विचार करणे ,ह्यालाच श्री गुरु हेच आमच्या ज्ञानाचे विषय झाले असे म्हणता येईल .""विषय तो त्यांचा झाला नारायण"" हा भाव महत्वाचा आहे .हा ज्ञानाचा विषय असावा .श्रीगुरू जो ब्रह्मरसाचा आहार घेतात तो आम्हीही घ्यावा .आणि ब्रह्मरूप व्हावे .मला जीव दशेतून श्रीगुरू आत्मस्थितीला पोहोचविणार आहेत ह्या दृष्टीने जेव्हा साधक साधना करतो तेंव्हा त्याच्या साधन रुपी वृक्षाला मोक्ष रुपी फळ लागल्याशिवाय राहत नाही .साधना हि विचारांनीच करायची आहे .आणि म्हणून साधकाला साधनेसाठी प्रवृत्त व्हावेच लागेल .अशा रीतीने साधन केल्यास प्रत्यक्ष श्रीगुरूच शिष्याच्या हाती निवृत्ती

बहाल करतात .तुझे कारणी देह माझा पडावा केवळ हाच विचार असावा . सेवेची गरज साधकाला आहे कारण ह्या सेवेतून अहंकाराचा लय होतो .ह्यामुळे सत्व गुणांची वाढ होईल चित्त शांत होईल आणि ते आत्मज्ञाना साठी अनुकूल होईल .आत्यंतिक प्रेमाचा विषय हा फक श्रीगुरूच आसवे .आपल्या जवळच्या प्रेमाची दिशा हि फक्त श्रीगुरुकडे असावी .श्रीगुरुंनी सांगितल्या नुसारच जीवन जगावे .व्यवहार हा व्यवहारापूरता करावाच लागेल पण दृष्टी ही  श्रीगुरुंनी दिलेलीच असवी .आणि हि सर्व आम्हाला नर देहातच शक्य आहे .तो श्रीगुरुंच्या चरणाशी प्रामाणिक राहूनच वापरला पाहिजे .श्रीगुरू हेच मोक्षद आहेत हाच माझा निर्णय असला पाहिजे .मानवी देहात हि बाब शक्य आहे म्हणून मानवी देह हीच काशी आहे .ज्ञानगंगा हे मोक्षाचे साधन आहे निजबोधाला  प्राप्त झाले कि हि व्यापक गंगा होते .असे अपरोक्षनुभूती येऊन जेव्हा आम्ही श्रीगुरुंचे ध्यान करतो तेव्हा आम्ही प्रयाग येथे असतो .सविशेष ज्ञानाला हाती घेऊन आम्हाला निर्विशेष ज्ञानात प्रवेश करावयाचा आहे .जीवाच्या तीनही अवस्थांचे ज्ञान बुद्धीच्या आधारे चिदाभासाला  होते .हे ज्ञान मी आहे मी ज्ञानरूप आत्मा आहे मीच सदाशिव आहे .देहादी जगतापासून मी अलिप्त आहे ,असंग आहे ,ह्यालाच निजबोध म्हणतात आणि ह्या निजाबोधालाच काशी म्हणतात .ह्या काशीला आपण अनुभवाने पोहोचावे ".चरण तुझे मम भाळी  लागो .आत्मभाव ह्या जन्मी जागो  : असे श्री सुनील काका म्हणतात .गुरु  सेवा गुरुचरणाचे   ध्यान आवश्यक आहे .असा हा निजबोध आचार्यांनी पाच श्लोकांच्या माध्यमातून दिले असे .ते आमच्या समोर प्रत्यक्ष निजबोधाचे स्वरूप व्यक्त करीत आहेत .श्रीगुरुंच्या कृपेने हा निजबोध सर्व साधकांना होवो हीच श्रीगुरू चरणी प्रार्थना

!! इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यस्य
श्रीगोविंदभगवत्पूज्यपादशिष्यस्य
श्रीमच्छंकरभगवत: कृतौ
काशीपञ्चकम् संपूर्णम् !!



## ॥ लेखिकेबाबत ॥

सौ शैलजा सुनील लुले यवतमाळ ह्या डॉ सुनील ना लुले ह्यांच्या सुविद्य पत्नी .उच्च विद्या विभूषित .पूर्वाश्रमीच्या शैलजा वसंतराव जलतारे .३ मार्च १९६२ हे रोजी आकोट येथे श्री वसंत राव व सौ सुहासिनी जलतारे ह्यांच्या पोटी जन्म झाला .अत्यंत समृद्ध बालपण आणि माहेरचा समृद्ध संस्कारांचा ठेवा घेऊन शैलजा ह्यांनी यवतमाळ स्थित डॉ सुनील ना लुले ह्यांच्या घरात अर्धांगिनी म्हणून प्रवेश केला आणि हि त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली .श्वसुर श्री नारायणराव अर्थात श्री नानासाहेब लुले ह्यांच्या अध्यात्मिक समृद्धीचा वारसा लाभलेल्या कुटुंबात त्यांचा प्रवेश हा आध्यात्माच्या प्रांतातील प्रवेश .खऱ्या अर्थाने गृहस्थाश्रमात प्रवेश .आणि ह्या गृहस्थाश्रमात आपली सर्व कर्तव्य अत्यंत आनंदाने पूर्ण करताना आपल्या दोन्ही मुलांना डॉक्टर आणि इंजिनिअर करून त्यांच्या सुविद्य स्नुषा असे सार्थक जीवन व सफल गृहस्थाश्रम, डॉ सुनील लुले ह्यांचे सोबत जीवनाची वाटचाल करताना त्यांचे जीवन जे अध्यात्मिक दृष्ट्या समृध्द झाले ते प. पू. सद्गुरू डॉक्टर काका देशमुख ह्यांचे मुळे .आणि जीवनाची संपूर्ण दिशाच पालटली .उपनिषद ,श्रीमद भगवद्गीता ,दासबोध एकनाथी भागवत अशा ग्रंथाचा अभ्यास ,श्रीमद् शंकराचार्य ह्यांची विविध स्तोत्रे ह्यावरील त्यांचे भाष्य हे अत्यंत उच्च कोटीच्या साधनेची अभिव्यक्तीच म्हणावी लागेल .सर्वांना केवळ आणि केवळ प्रेम देणारी ,अत्यंत निस्वार्थ ,सर्वांनी खूप पुढे जावे ह्या साठी स्वतः धडपडणारी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शांत असणे हा जिचा स्थायी भाव आहे अशी माझी ताई म्हणजे प पू डॉक्टर काकांनी वर्णन केलेली सदाफुली आहे .शैलजा ताई चे प्रवचन म्हणजे साधकांसाठी एक पर्वणीच असते.तिचे प्रवचन म्हणजे ""माउलीने आपल्या अपत्याला अत्यंत मउसुत साजूक तूप घातलेला भात भरवावा"" असे वर्णन साधकांनी केलेले आहे . अशी गुरुस्थानी असणाऱ्या सौ शैलजा सुनील लुले म्हणजे माझीच ताई





